**नेमणे आहे**

नामवंत दै. ‘जनता आवाज’ वृत्तपत्रासाठी प्रतिनिधी नेमणे आहेत.

१) अहिल्यानगर
२) पुणे
३) नाशिक
४) छत्रपती संभाजीनगर
५) बीड

संपर्क:- ८८९६७११७११

jantaawajnews@gmail.com

दैनिक

# जनता आवाज

अहिल्यानगर | वर्ष ०२ रे | अंक १३० शुक्रवार, दि. ०४ जुलै २०२५ | PRGI No. MHMAR/25/RAA11 | पाने ०८ | किंमत ४ रुपये

साई समर्थ सिमेंट प्रॉडक्टस्

पाईप कंपनी ६ इंच ते ६ फुटापर्यंत सिमेंट पाईप (As Per ISI) योग्य दरात उपलब्ध.

सिमेंट पाईप | सेफ्टिक टँक | वॉटर टँक | गव्हाणी,ढापे | सिमेंट पोल

सतिष उत्तमराव खर्डे पा. 9552749534
अमोल सिताराम थोरात पा. 9764626533
ज्ञानेश्वर रघुनाथ खर्डे पा. मा.उपसरपंच,को.बु।।

राजुरी रोड,श्री स्वामी समर्थ केंद्राच्या पुढे,कोल्हार बु।। 9765481334

# .. तर पोलिस होणार बडतर्फ

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा इशारा; आता राज्यात २४ तास वाळूची वाहतूक

जनता आवाज वृत्तसेवा

**मुंबई : अमली पदार्थांच्या तस्करीत हात असणाऱ्या पोलिसांवर बडतर्फीची कारवाई करण्याची घोषणा केली. अमली पदार्थांच्या व्यवहारात पोलिसांचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष सहभाग आढळल्यास कलम ३११ अंतर्गत बडतर्फ करणार असल्याचा इशारा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल गुरूवारी विधान परिषदेच्या हिवाळी अधिवेशनात दिला.**

राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाचा कालचा चौथा दिवस होता. यावेळी विविध विषयांना विरोधकांनी हात घालत त्यावर राज्य सरकारने सविस्तर त्याला देऊन तुमचे प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासनही देण्यात आले आहे. शासन विद्यार्थ्यांची घटती पटसंख्या, शाळाबाह्य विद्यार्थी आणि शिक्षणाच्या गुणवत्तेसंदर्भात गंभीर असून सर्वंकष उपाययोजना राबवित आहे. यु-डायस प्रणालीच्या आकडेवारीनुसार विद्यार्थ्यांची संख्या काहीशी घसरलेली असली तरी त्यामागील कारणे समजून घेऊन योग्य ती कार्यवाही केली जात असल्याचे शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी अर्धातास चर्चेला उत्तर देताना सांगितले.

चंद्रपूर परिसरातील औष्णिक विद्युत केंद्र, कोळसा खाणी व स्टील उद्योगांमुळे निर्माण होणाऱ्या प्रदूषणाच्या प्रश्नावर शासन जागरूक असून विविध उपाययोजना राबविण्यात येत आहे, अशी माहिती पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी विधानपरिषदेत अर्धा तास चर्चेच्या उत्तरात दिली. चंद्रपूर परिसर २०१० मध्ये क्रिटिकली पॉल्युटेड एरिया म्हणून नोंदवलेला होता.

मात्र विविध उपायांमुळे प्रदूषण निर्देशांक ८३ वरून ५४ वर आला आहे. यामुळे काही उद्योगांना अटींवर परवानग्या देण्यात आल्या आहेत. प्रदूषण नियंत्रणासाठी उद्योगांना ईएसपी (इलेक्ट्रोस्टॅटिक प्रिसिपिटेटर), डस्ट कलेक्टर, ऑनलाइन म ॉनिटरिंग सिस्टीम, जलप्रदूषण नियंत्रणासाठी ट्रीटमेंट प्लांट, पाण्याचा पुनर्वापर, रस्त्यांचे पक्कीकरण व फवारणीसारख्या अटी बंधनकारक करण्यात आल्या असल्याचेही मंत्री पंकजा मुंडे यांनी सांगितले.



चंद्रपूर जिल्ह्यातील कोसंबी पेठ ता. पोंभुर्णा येथे औद्योगिक वसाहत उभारण्याबाबत शासन सकारात्मक आहे. या औद्योगिक वसाहतीसाठी १०२.५० हेक्टर जमिनीची आवश्यकता असून संपादनासाठी ६ कोटी ७ लाख ५२ हजार रुपयांचा निधी देण्यात आला आहे. यापैकी ४२.५९ हेक्टर जमीन संपादनाला थेट खरेदीद्वारे मान्यता देण्यात आलेली आहे. उर्वरित भूसंपादन प्रक्रिया ६० दिवसात पूर्ण करण्यात येईल, अशी माहिती उद्योग राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांनी अर्धा तास चर्चेच्या उत्तरात दिली.

राज्य शासनाने सौर ऊर्जे वर आधारित कृषी पंप देण्यावर भर दिला आहे. मात्र भौगोलिक परिस्थितीनुसार सौर पंप देणे शक्य नसल्यास त्या ठिकाणी पारंपरिक कृषी पंप देण्याबाबत शासन विचार करेल. शेतकऱ्यांसाठी कृषी पंपांना वीज जोडणी देण्यासंदर्भात लवकरच बैठक घेऊन याबाबत सकारात्मक निर्णय घेतला जाईल, अशी माहिती ऊर्जा राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांनी अर्धा तास चर्चेच्या उत्तरात दिली.

वाळू, रेतीची वाहतूक वैध परवाना देऊन २४ तास करण्याचे निवेदन राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी काल विधानसभेत केले.

### ... ही खऱ्याची दुनिया नाही : जयंत पाटील

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी सभागृहात महाट्रान्सकोच्या भरतीवर भाष्य केले. ते हा मुद्दा उपस्थित करण्यासाठी उठले तेव्हा ठाकरे गटाचे नेते आदित्य ठाकरे खाली बसले. त्यावर आपण म्हणेल त्याच्यासाठी खाली बसलोत, तर सर्वच उठतील, ही खऱ्याची दुनिया नाही, अशी मिश्किल टिप्पणी जयंत पाटील यांनी केली.

### सीट्रिपलआयटीच्या कामाला गती : पवार

बीड येथे टाटा टेक्नॉलॉजीच्या माध्यमातून सुरु करण्यात येणाऱ्या सेंटर फॉर इन्व्हेंशन, इनोव्हेशन, इक्युबेशन अँड ट्रेनींग अर्थात सीट्रिपलआयटीसाठी बीड एमआयडीसी औद्योगिक क्षेत्राच्या सुविधा क्रमांक तीन मधील चार हजार चौरस मीटर जागा तसंच केंद्र उभारणीसाठी आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्याचा निर्णय एमआयडीसीच्या संचालक मंडळानं घेतला आहे. या निर्णयामुळे बीड जिह्यातील युवकांना औद्योगिक प्रशिक्षण, तांत्रिक कौशल्यविकासाच्या माध्यमातून उद्योगक्षम बनवणं, रोजगार, स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध करुन होण्याचा मार्ग खुला झाला आहे, असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितले.

# जिहादी प्रवृत्तीच्या लोकांना धडा शिकविणार

## संपत बारस्कर, गणेश भोसलेंचा इशारा; आ. जगतापांना संरक्षण देण्याची मागणी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : जिहादी लोकांना भारताचे संविधान शिकवण्याची खरी गरज आहे. लव जिहाद वोट जिहाद करत हिंदू धर्माच्या विरोधात काम करत आहे. आम्ही देखील आमच्या धर्माचे काम करत असून कोणीही आडू शकत नाही. दौंड येथील बादशाह या नावाच्या व्यक्तीला तातडीने पोलिसांनी अटक करावी,



अन्यथा आम्ही त्याला घेऊन पोलीस प्रशासनाच्या ताब्यात देऊ. फेक अकाउंटवर देखील कारवाई करावी, अन्यथा अशा जिहादी प्रवृत्तीच्या लोकांना धडा शिकवण्याचे काम केले जाईल, असा इशारा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर व माजी उपमहापौर गणेश भोसले यांनी पोलीस प्रशासनाला निवेदनाद्वारे दिला आहे.

यावेळी माजी नगरसेवक प्रकाश भागानगरे, संजय चोपडा, विनीत पाऊलबुद्धे, अविनाश घुले, अजिंक्य बोरकर, आशाताई निंबाळकर, माणिक विधाते, बाळासाहेब पवार, सुरेश बनसोडे, दिपक खेडकर, रेश्मा आठरे, सागर बोरुडे, साधनाताई बोरुडे, मयुर बांगरे, लतिका पवार, युवराज शिंदे, सनी कोवळे, नितीन घोडके, राजेश भालेराव, श्रेणिक शिंगवी, गिरीश जगताप, महेश गलांडे, अंजली आव्हाड, धीरज उकिर्डे, मारुती पवार, सुंनदा शिरवळे आदी उपस्थित होते.

निवेदनात पुढे म्हणले की, शहराचे आ. संग्राम जगताप हे हिंदू धर्माच्या प्रचाराकरिता ठिकठिकाणी सभा पान ४

धमकी प्रकरणाबाबत कोतवाली पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल आहे. या प्रकरणाची पोलीस प्रशासनाने दखल घेतली असून योग्य ती कारवाई निश्चित केली जाईल. तसेच शहरातील अनधिकृत फ्लेक्स बोर्डवर महापालिकेने कारवाई करावी. आम्ही देखील त्यासाठी पोलीस संरक्षण देणार आहोत.

**– सोमनाथ घार्गे, पोलीस अधीक्षक**

# ‘अपप्रचार कराल, तर कारवाई करणार’

## सीईओ गाडीलकरांचा इशारा; श्री साई संस्थान व बाबांविषयी चुकीचे माहिती देणे भोवणार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**शिर्डी** : श्री साईबाबा संस्थान व श्री साईबाबांविषयी समाज माध्यमे व प्रसारम ाध्यमांवर पसरविली जात असलेली चुकीची, दिशाभूल करणारी व बदनामीकारक माहिती ही अतिशय गंभीर व दु:खद बाब आहे. याविरोधात संस्थानकडून कठोर कायदेशीर पावले उचलण्यात येत असून, अशा प्रकारच्या अपप्रचाराला कदापिही प्रोत्साहन दिले जाणार







नाही, अशी माहिती श्री साईबाबा संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांनी दिली आहे.

अलीकडेच सोशल मीडियावर श्री साईबाबा संस्थानने हज यात्रेसाठी ३५ कोटी रुपयांचा निधी दिला आहे. असा भ्रामक व खोटा व्हिडिओ प्रसारित करण्यात आला आहे. संस्थानने यासंदर्भात स्पष्टपणे सांगितले आहे की, अशा कोणत्याही प्रकारचा निधी वितरित केलेला नाही. हा संपूर्ण दावा पान ४

श्री साईबाबांवरील प्रेम, श्रद्धा व भक्ती जपणाऱ्या लाखो भक्तांच्या भावना आणि संस्थानची प्रतिष्ठा राखण्यासाठी, भविष्यातही अशा प्रकारच्या अपप्रचार करणाऱ्यांविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे.

**– गोरक्ष गाडीलकर,** सीईओ– साई संस्थान, शिर्डी

# साहेब, माव्यावरील कारवाईत सातत्य ठेवा

## महिलांमधून मागणी; पोलिस अधिक्षकांच्या कारवाईचे स्वागत

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : जिल्ह्यातील विविध ठिकाणच्या मावा अड्ड्यांवर पोलिसांची कारवाई सुरु केलेली आहे. या कारवाई मोहीम सुरु केलेली आहे. या मोहिमेचे म हिलावर्गातून स्वागत होत असून ही मोहीम अशीच सुरु ठेवावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.



जिल्ह्यातील अहिल्यानगर शहरासह पाथर्डी येथील मावा सेंटरवर पोलिसांनी छापा टाकून लाखो रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. या प्रकरणी काहीजणांवर गुन्हे दाखल करण्यात आलेले आहे.

ही कारवाई सुरू झाल्यापासून मावा टपर्या चौकातून हटल्या असून आडोशाला मावा विक्री सुरू झालेली आहे. अहिल्यानगर शहरातील एका पेट्रोलपंपव सर्व्हिस सेंटर व एका मिठाईच्या दुकानासमोर गेल्या अनेक दिवसांपासून पान ४

### माव्यासाठी अनेकांची भटकंती

मावा खाण्यासाठी मिळावी,यासाठी अनेकाजणांची भटकंती सुरु आहे. काहीजण शेजारील जिल्ह्यातून खाण्यासाठी मावा आणत आहे. रोज एकजण बाहेरून मावा आणत असून त्याचे वितरण इतरांना केले जात आहे. हा प्रकार जिल्ह्यातील अनेक गावात सुरु झालेला आहे.

### पोलिस दलाची झाडाझडती कधी?

पोलिस दलातील काही अधिकारी व कर्मचारी मावा व गुटखा खात आहे. अशांवरही कारवाई होणे गरजेचे आहे. पोलिस अधीक्षकांनी अशा पोलिसांवर कारवाई करावी अशी मागणी होत आहे. यासाठी एक विशेष पथक तयार करून पोलिस कर्मचारी यांची तपासणी करावी, अशी मागणी नागरिकांमधून होत आहे.


# आपत्तीग्रस्तांच्या व्यवस्थापनासाठी ठोस निर्णय घ्या

## वाळुंबा नदीच्या महापुरामुळे झालेल्या नुकसानीकडे आ. दातेंनी शासनाचे वेधले लक्ष

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर** : पारनेर-नगर मतदार संघातील सुपापासून खडकी, खंडाळ्यासह जिल्ह्यातील विविध भागात दि. २७ मे रोजी अचानक झालेल्या अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. नगर तालुक्यातील वाळुंबा नदीला आलेल्या महापुराने जनजीवन विस्कळीत झाले असून यामध्ये रस्ते, शेती, पिके, जनावरे व घरांचे मोठे नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर आ. काशिनाथ दाते यांनी महाराष्ट्र विधानसभेत पावसाळी अधिवेशनात नियम २९३ अंतर्गत प्रस्ताव मांडत शासनाचे लक्ष वेधले.

महापुरामुळे अनेक गावांम ध्ये ग्रामस्थ अडकून पडले होते. आ. दाते यांना माहिती मिळताच घटनास्थळी जाऊन स्थानिक धाडसी ग्रामस्थांची मदत व प्रशासनाच्या मदतीने त्यांना सुरक्षित बाहेर काढण्यात यश आले. मात्र, जलसाठे, रस्ते व शेतजमिनीचे नुकसान होऊन परीसरात मोठ्या प्रमाणावर आर्थिक व सामाजिक नुकसान झाल्याचे विदारक चित्र निर्माण झालेले असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले.



जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी अतिशय तत्परतेने दुसऱ्याच दिवशी महापूरग्रस्त भागांचा दौरा करून प्रत्यक्ष पाहणी केली. त्यांनी संबंधित विभागांना तातडीने पंचनामे करून शासनाकडे अहवाल सादर करण्याचे आदेश दिले होते. त्या अनुषंगाने सर्व विभागांनी अहवाल व झालेल्या नुकसानीची आकडेवारीही सादर केली असून, परिस्थिती पुर्ववत करण्याच्या दृष्टीकोनातून अत्यावश्यक असलेल्या उपाययोजनांची माहितीही शासनाकडे पाठवण्यात आलेली असल्याचेही त्यांनी सांगितले. आ. दाते म्हणाले की, एकंदरीत या प्रस्तावाच्या माध्यमातून त्यांनी पारनेर-नगर मतदारसंघासह संपुर्ण ग्रामीण भागातील समस्या, अडचणी आणि विकासासाठी आवश्यक उपाययोजनांकडे शासनाचे लक्ष वेधले. ग्रामीण भागातील नागरिकांचे जीवनमान उंचावण्यासाठी आणि आपत्तीग्रस्त भागाच्या व्यवस्थापनासाठी ठोस आणि सकारात्मक निर्णय घेण्याचे आवाहन त्यांनी यामाध्यमातून सरकारला केले आहे.

अतिवृष्टीमुळे माझ्या मतदारसंघातील शेतीसह रस्ते पुल, सी. डी. वर्कचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. पालकमंत्री विखे यांनी तत्परतेने नुकसानीची पाहणी करून अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले. प्रचंड नुकसान झालेली आहे, शेतकऱ्यांचे झालेले नुकसानाची शासनाने दखल घ्यावी.

**– काशिनाथ दाते, आमदार**

# सहकारनगरीत उद्या विठू नामाचा गजर

## लोणीत आषाढी वारीनिमित्त ‘वारी पंढरीची, ज्ञानगंगा प्रवरेची’ उपक्रमाचे आयोजन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**लोणी** : पंढरीची वारी ही महाराष्ट्राची आध्यात्मिक परंपरा जपण्यासाठी प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या सुमारे १५ हजार विद्यार्थ्यांच्या सहभाग असलेली वारी पंढरीची ज्ञानगंगा प्रवरेची या अध्यात्मि क सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून, वारकरी वेषभूशेतील विद्यार्थी वारीतील भव्य रिंगण सोहळ्याच्या माध्यम ातून प्रति पंढरपूर निर्माण करणार आहेत.

या विशेष उपक्रमाचे आयोजन उद्या, दि. ५ जुलै २०२५ रोजी सकाळी नऊ वाजता लोणी येथील विखे पाटील सैनिकी स्कूल समोरील भव्य प्रांगणात आयोजित करण्यात आला असून तत्पुर्वी



सर्वगावांमधून विद्यार्थी शिक्षक आणि पालकांचा सहगाग असलेल्या दिंड्या टाळ मृदूगांचा गजर आणि विठु नामाचा जयघोष करीत सहकाराच्या भूमीत दाखल होणार असून यासर्व दिंड्याचे भव्य स्वागत करण्यासाठी सहकार नगरी सज्ज झाली आहे.

प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे पाटील यांच्या संकल्पनेतून या आषाढी वारीच्या अध्यात्मिक आणि सांस्कृतिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले असून, पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील तसेच लोकनेते पद्मभूषण डॉ. बाबासाहेब विखे पाटील यांचे वारकरी पान ४

### टाळ मृदूगांच्या तालावर खेळाचे प्रात्यक्षिक

वारी पंढरीची... ज्ञानगंगा प्रवरेची या संकल्पनेतून प्रवरा शैक्षणिक संकुल आणि प्रवरा परिवारच्या माध्यमातून शिक्षण घेत असलेल्या विविध शाळा, कनिष्ठ महाविद्यालये, तांत्रिक आणि अतांत्रिक महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक आणि पालक यांचा सहभाग या सर्व सांस्कृतिक उपक्रमात असेल यसाठी मागील काही दिवसांपासून विद्यार्थी अतिशय उत्साहाने टाळ मृदूगांच्या तालावर दिंडीतील विविध खेळाचे प्रात्यक्षिक करीत आहेत.

### मंत्री विखेंसह मान्यवर उपस्थित राहणार

राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के पाटील, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनीताई विखे पाटील, प्रवरा अभिमत विद्यापीठाचे कुलपती डॉ. राजेंद्र विखे पाटील, विखे पाटील कारखान्याचे अध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील, विविध संस्थांच्या पदाधिकाऱ्यांसह दिग्गज मान्यवर सोहळ्यात सहभागी होण्याच्या दृष्टीने नियोजन करण्यात आले आहे.

## संमिश्र

### पहलगामहून पहिला जत्था रवाना

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पहलगाम** : आजपासून अम रनाथ यात्रा सुरू झाली आहे. गुरुवारी सकाळी बाबा अम रनाथ यांची पहिली आरती करण्यात आली. पहिला जत्था बालटाल आणि नुनवान (पहलगाम) बेस कॅम्पमधून अमरनाथ गुहेकडे रवाना झाला. यादरम्यान, भाविक हर हर महादेव आणि बम बम भोलेचा जयघोष करत राहिले.

बुधवारी, जम्मूतील भगवती नगर कॅम्प येथून ५,८९२ यात्रेकरूंच्या पहिल्या तुकडीला लेफ्टनंट गव्हर्नर मनोज सिन्हा यांनी हिरवा झेंडा दाखवला. हे लोक दुपारी काश्मीरमध्ये पोहोचले, जिथे प्रशासन आणि स्थानिक लोकांनी त्यांचे स्वागत केले.

### बिहारमध्ये लग्नाच्या १ महिन्यानंतर पतीची हत्या

**जनता आवाज वृत्तसेवा**

**औरंगाबाद** : ज्याप्रमाणे इंदूरच्या सोनमने तिच्या पती राजा रघुवंशीची हत्या केली, त्याचप्रमाणे बिहारच्या औरंगाबादमधूनही असाच एक प्रकार समोर आला आहे. जिथे एका २७ वर्षीय भाचीने तिच्या ६० वर्षीय मामाच्या प्रेमापोटी तिच्या पतीची हत्या केली. २४ जून रोजी २७ वर्षीय प्रियांशू उर्फ छोटूची गोळ्या घालून हत्या करण्यात आली. प्रियांशू आणि गुंजाचे लग्न २१ मे रोजी झाले. मुलीने लग्नाच्या मंडपातच तिच्या पतीच्या हत्येची योजना आखली. लग्नाच्या सुमारे १ महिन्यानंतर, पत्नीने एका शूटरला कामावर ठेवले आणि तिच्या पतीची हत्या केली. २ जुलै रोजी पोलिसांनी आरोपी पत्नीला अटक केली. मामा जीवन सिंग फरार आहे. दोघांनीही हत्येसाठी झारखंडम धील दोन शूटरना कामावर ठेवले होते. पोलिसांनी जयशंकर चौबे आणि मुकेश शर्मा या दोन्ही शूटरनाही अटक केली आहे.

### मुसळधार पावसामुळे चारधामा यात्रा रोखली

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नवी दिल्ली** : उत्तराखंड मधील मुसळधार पावसामुळे चारधाम यात्रा तात्पुरती थांबवण्यात आली आहे. मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी म्हणाले की, भाविकांसाठी प्रवास मार्ग पूर्णपणे सुरक्षित झाल्यावरच यात्रा सुरू केली जाईल. उत्तराखंडम धील केदारनाथ मार्गावर सोनप्रयागजवळ बुधवारी रात्री भूस्खलन झाले आणि रस्ता बंद करण्यात आला. यादरम्यान ४० भाविक अडकले. एसडीआरएफ पथक घटनास्थळी पोहोचले आणि सर्वांना सुरक्षित बाहेर काढले. हवामान विभागाने आज राजस्थान-मध्य प्रदेशसह ११ राज्यांमध्ये पावसाचा ऑरेंज अलर्ट जारी केला आहे.



# मुलांनो, तुम्ही शिका, अभ्यास करा

**अमोल बागुल; विनायकराज प्रतिष्ठानच्या वतीने विद्यार्थ्यांना वह्या वाटप**

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करताना सामाजिक बांधिलकी, शिक्षणाविषयी जाणीव आणि विद्यार्थ्यांना भविष्यासाठीचा एक छोटासा हातभार आहे. आज १५० विद्यार्थ्यांना वह्या वाटप करून विनायकराज प्रतिष्ठानने एक छोटासा उपक्रम राबविला. यामुळे विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना आकार देण्याची संधी आहे. मुलांनो तुम्ही शिका, अभ्यास करा, प्रगती करा, ज्ञानाने तुमच्या आयुष्याचे सार्थक होईल, असे प्रतिपादन राष्ट्रपती पुरस्कार विजेते अमोल बागुल यांनी केले.



सावेडी येथील समर्थ विद्या मंदिर प्रशाळेत शालेय व यांचे वाटप विनायक राज प्रतिष्ठानच्यावतीने करण्यात आले यावेळी उपाध्यक्ष विनय वाखुरे, अतुल देव्हारे, पांडुरंग कोलते, मृगांक मुळे, मयूर कुलकर्णी, मुख्याध्यापिका संगीता जोशी, कानडे उपस्थित होते.

> विनायकराज प्रतिष्ठानने हा उपक्रम राबवून समाजापुढे चांगला आदर्श ठेवला आहे. समाजासाठी काहीतरी चांगले करू शकतो, ही भावना समोर ठेवून प्रत्येकाने असे काम केले तर विद्यार्थ्यांना मदत होईल. शैक्षणिक साहित्याची उपलब्धता वाढवण्याबरोबरच सामाजिक बांधिलकीचा ही सकारात्मक संदेश समाजात पोहोचतो.
>
> **– अमोल बागुल, राष्ट्रपती पुरस्कार विजेते**

# सीईटी परीक्षाप्रकरणी दोषींवर कारवाई करा

## आ. खताळ यांनी मागणी करताच मंत्री चंद्रकांत पाटील यांचे विधानसभेत उत्तर

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर :** महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्षामार्फत २८ हजार ८३७ विद्यार्थ्यांसाठी ४ मे २०२५रोजी एमएचटी सीईटीची परीक्षा घेण्यात आली होती. या परीक्षेमध्ये गणित विषयाच्या प्रश्नपत्रिकेमधील तब्बल २१ प्रश्न चुकीचे आले होते. त्यामुळे ही परिक्षा पुन्हा घेण्याचा निर्णय घेण्यात घेण्यात आला.

या प्रश्नाकडे आ. अमोल खताळ व इतर विधानसभा सदस्यांनी यांनी विधानसभेचे लक्ष वेधत तारांकित प्रश्न उपस्थित केला. त्यावर उत्तर देताना शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले की, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी फेरपरीक्षा घेण्यात आली होती. या प्रकरणी संबंधित विषय तज्ञांना कारणे दाखवा नोटीस बजावली असून, त्या आनुषंगाने राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाच्या वतीने योग्य ती कार्यवाही केली जाणार असल्याचे मंत्री चंद्रकांत पाटील यांनी सांगितले.



अहिल्यानगर जिल्ह्यातील एका परिक्षा केंद्रावर ५० गुणांच्या गणिताच्या प्रश्न पत्रिकेतील सुमारे २० ते २५ प्रश्नांमध्ये चारही पर्याय चुकीचे असल्यामुळे त्या विद्यार्थ्यांनी चुकीचे पर्याय निवडले. याबाबत त्यांनी परिक्षा केंद्राकडे तक्रार केली असता कोणतीही दखल घेतली गेली नसल्याचे निदर्शनास आले असल्याबाबत आ. अमोल खताळ यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून देत या प्रकरणाची चौकशी करून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली.

यात हलगर्जीपणा करणाऱ्यांवर काय कारवाई केली. हे सभागृहाला सांगावे असाही प्रश्न आ. खताळ यांनी सभागृहात उपस्थित केला.

आ. खताळ आणि इतर विधानसभा सदस्यांच्या तारांकित प्रश्नाला उत्तर देताना उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले की, शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करीता राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत एमएचटी-सीईटी २०२५ ही सामाईक प्रवेश परीक्षा पिसीबी आणि पिसीएम ग्रुपकरीता ९ ते दि. २७ एप्रिल, २०२५ या कालावधीत २८ सत्रात घेण्यात आली होती. त्यात २८ सत्रांपैकी २७ सत्रांमध्ये ६, लाख ७७, हजार ५६० उमेदवारांची परीक्षा सुरळीत पणे पार पडली . २७ एप्रिल, २०२५ रोजीच्या सकाळच्या सत्रामध्ये इंग्रजी, मराठी आणि उर्दू या भाषेमध्ये घेण्यात आलेल्या पिसीएम ग्रुपच्या परीक्षेदरम्यान २७ हजार ८३७ विद्यार्थी उपस्थित होते.

> **शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीची चौकशी**
>
> भारतातून अमेरिकेला निर्यात केलेला ४ कोटी २८ लाख रुपये किमतीचा आंबा कागदपत्रातील त्रुटीमुळे अमेरिकेतील व्यापाऱ्यांनी स्वीकारण्यास नकार दिला. त्यामुळे तो आंबा पुन्हा आणणे शक्य नव्हते, त्यामुळे तो अमेरिकेतच नाहीसा करावा लागला. यातून या आंबा उत्पादक शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे या प्रश्नाकडे विधानसभेचे आमदार अमोल खताळ यांनी लक्ष वेधले त्यावर राज्याचे विपणन मंत्री जयकुमार रावल म्हणाले की, शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीची चौकशी करून नुकसान भरपाईच्या रकमेबाबतची खाताजमा करण्यात येत असल्याचे विपणनमंत्री जयकुमार रावल यांनी विधानसभेत आमदार अमोल खताळ यांच्या तारांकित प्रश्नाला उत्तर देताना सांगितले.

# तीन खेळाडूंची राष्ट्रीय फुटबॉल कॅम्पसाठी वर्णी

## कृष्णराज टेमकर, भानुदास चंद आणि जसवीर ग्रोव्हर यांचा समावेश



कृष्णराज टेमकर | भानुदास चंद | जसवीर ग्रोव्हर

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** जिल्ह्यातील फुटबॉलच्या इतिहासात प्रथमच शहरातील ३ खेळाडूंची अखिल भारतीय फुटबॉल महासंघाद्वारे आयोजित करण्यात येणाऱ्या कनिष्ठ राष्ट्रीय फुटबॉल कॅम्पसाठी निवड करण्यात आली आहे. यामध्ये कृष्णराज गुरुदत्त टेमकर, भानुदास पंढरीनाथ चंद आणि जसवीर कुलदीपसिंग ग्रोव्हर यांचा समावेश आहे.

उदयोन्मुख खेळाडूंसाठी अत्यंत मानाची अशी समजल्या जाणाऱ्या डॉ. बी.सी. रॉय चषकमध्ये सहभागी होणाऱ्या महाराष्ट्र संघाच्या प्रशिक्षण शिबिरासाठी सदर खेळाडूंची निवड झाली आहे.

या खेळाडूंनी नोव्हेंबर २०२४ मध्ये पार पडलेल्या राज्य अजिंक्यपद स्पर्धे त उत्कृष्ट कामगिरी करताना निवड समितीचे लक्ष वेधले. त्यांच्या खेळातील कौशल्य, मैदानावरील चपळता आणि संघभावना यामुळे त्यांची निवड राष्ट्रीय पातळीवरील कॅम्पसाठी करण्यात आली आहे.

या खेळाडूंच्या कामगिरीमुळे जिल्ह्याच्या संघाने राज्य अजिंक्यपद स्पर्धेमध्ये छत्रपती संभाजीनगर, नाशिक, नागपूर अशा मातब्बर संघांचा पराभव करत स्पर्धेच्या उपांत्य फेरीपर्यंत मजल मारली. कृष्णराज टेमकर आणि भानुदास चंद हे आठरे पाटील पब्लिक स्कूलचे तर जसवीर ग्रोव्हर हा तक्षिला स्कूलचा विद्यार्थी आहे.

> **दिग्गज मान्यवरांकडून विद्यार्थ्यांचे कौतुक**
>
> खेळाडूंच्या निवडीबद्दल जिल्हा फुटबॉल संघटनेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया, मनोज वाळवेकर, खालिद सय्यद, अमरजितसिंग शाही, जोगासिंग मिन्हास, सचिव रौनप फर्नांडिस, प्रदीप जाधव, व्हिक्टर जोसेफ, रिशपालसिंग परमार, रणबीरसिंग परमार, जेव्हिअर स्वामी, वैभव मनोदिया आदींसह सर्व पालकांनी त्यांचे अभिनंदन करुन त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

> खेळाडूंची निवड ही संपूर्ण जिल्ह्यासाठी अत्यंत अभिमानास्पद बाब असून, हे यश खेळाडूंच्या कष्टाचे आणि त्यांचे प्रशिक्षक, पालक आणि जिल्हा फुटबॉल संघटनेच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचे फलित आहे. या निवडीमुळे जिल्ह्यातील युवा खेळाडूंमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.
>
> **– रौनप फर्नांडिस**

# पोलिसांच्या सतर्कतेने टळला बालविवाह

**जनता आवाज वृत्तसेवा**

**गंगापूर :** तालुक्यातील लासूर स्टेशन येथे दि. ३ जुलै २०२५ रोजी शिल्लेगाव पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सलीम चाऊस यांना सकाळी १०.३० वाजता एक गोपनीय माहिती मिळाली. माहिती अशी होती की, लासुर स्टेशन येथील शिरसाट गल्ली येथे एका अल्पवयीन मुला-मुलीचा बालविवाह होण्याची शक्यता होती.

ही माहिती मिळताच पोलीस निरीक्षक चाऊस यांनी तात्काळ कारवाई करत तात्याराव बेंद्रे, गोपनीय शाखेचे



योगेश हरणे, भिसे व सुरडकर यांना घटनास्थळी पाठवले. अधिकाऱ्यांनी तत्काळ शिरसाट गल्लीत जाऊन चौकशी केली असता, तिथे साखरपुड्याचा कार्यक्रम सुरू असल्याचे समजले.

तथापि, साखरपुड्यात जमलेले पाहुणे व नातेवाईक तिथेच विवाह लावून घेण्याच्या विचारात असल्याचे स्पष्ट झाले. हे लक्षात येताच पोलीसांनी मुलगा, मुलगी व त्यांच्या पालकांना लासुर स्टेशन पोलीस चौकीत आणले. यावेळी शिल्लेगाव पोलीस ठाण्याच्या तत्परतेमुळे एक मोठा बालविवाह थांबवण्यात यश आले असून, कायदेशीर शिक्षण व समाजप्रबोधनाचे उदाहरण म्हणून या घटनेकडे पाहिले जात आहे.

> **कायदेशीर वय झाल्यावर लग्न करणार**
>
> केवळ साखरपुडा ठेवलेला असून, पाहुण्यांच्या आग्रहाने लग्न लावण्याचा विचार निघाला होता. मात्र, पोलीस निरीक्षक सलीम चाऊस यांच्या वेळेवरच्या हस्तक्षेपाने त्यांना योग्य कायदेशीर मार्गदर्शन मिळाले. त्यामुळे संबंधित पालकांनी लेखी दिलेल्या पत्रात, सहा महिन्यानंतर दोघांचे वय कायदेशीर वयापर्यंत पोहोचल्यावरच लग्न करण्यात येईल, असे स्पष्ट नमूद केले आहे.

# पिकविमा नुकसान भरपाई तक्रार निवारण कॅम्प

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपुर :** स्वतंत्र भारत पक्ष, शेतकरी संघटना, महिला आघाडी अहिल्यानगर आयोजित पीकविमा नुकसानभरपाई तक्रार निवारण कॅम्प दि. १ जुलै रोजी ओरिएंटल इन्शुरन्स कंपनी ऑफिस येथे झाला यात श्रीरामपूर तालुक्यातील अडीच हजार पेक्षा जास्त शेतकऱ्यांनी त्यांच्या तक्रार निवारण करण्यासाठी उपस्थिती लावली.

श्रीरामपूर तालुक्याला पीकविमा नुकसान भरपाई ४ निकषपैकी स्थानिक नैसर्गिक आपत्ती आणि पीक काढणी पश्चात नुकसान या दोन निकष निकषांनुसार भरपाई मंजूर होऊन देण्यात येणार आहे. त्यापैकी स्थानिक नैसर्गिक आपत्तीचे नुकसान भरपाई देण्यात आली आहे. तर काढणी पश्चात नुकसान भरपाई अद्याप मिळाली नाही. अनेक शेतकऱ्यांचे आधार लिंक बँक खात्यात पैसे जमा झाले आहेत. त्यांनी आपल्या आधार नंबरशी लिंक असलेल्या बँक खात्यात पैसे जमा झाल्याची खात्री करून घ्यावी.



पीक काढणी पश्चात नुकसान, स्थानिक नैसर्गिक आपत्ती भरपाई चे तालुक्यात साधारण २ हजार शेतकऱ्यांना २ कोटी पेक्षा जास्त रक्कम विमा कंपनी कडून घेणे आहे तर नगर जिल्ह्यात सुमारे १० कोटी पेक्षा जास्त रक्कम घेणे आहे. अनेक शेतकऱ्यांचे नुकसान भरपाई डावे ७२ तासांचे आत तक्रार दाखल करण्याच्या नियममुळे नाकारण्यात आले आहेत.

याप्रसंगी स्वतंत्र भारत पक्षाचे जिल्हाध्यक्ष नीलेश शेडगे, सुनीताताई वानखेडे, कोमल वानखेडे, नवनाथ दिघे, अंबादास गमे, अशोक आव्हाड, स्वप्नील मोकळ, अस्लम सय्यद हे तक्रार निवारण करण्यासाठी उपस्थित होते.

> **नुकसान भरपाई शेतकऱ्यांना देणार**
>
> शासनाकडे पीकविमा कंपन्याचे पीकविमा हप्त्याचे सुमारे १४०० कोटी रुपये घेणे आहे. ती रक्कम शासनाने पीकविमा कंपन्यांना दिल्यावर विमा कंपन्या काढणी पश्चात नुकसान भरपाई शेतकऱ्यांना देणार असल्याचे विमा कंपनी अधिकाऱ्यांनी सांगितले आहे.

# प्रवरा कला अध्यापक संघाच्या अध्यक्षपदी तुपे

## संतोष पुलाटे यांची उपाध्यपदी निवड; शैक्षणिक क्षेत्रातून अभिनंदनाचा वर्षाव

**जनता आवाज वृत्तसेवा**

**लोणी :** कला क्षेत्रातील विद्यार्थ्या त्यांना विविध स्पर्धा आणि मार्गदर्शन व्हावे या उद्देशाने स्थापन झालेल्या प्रवरा परिसर कला अध्यापक संघाच्या अध्यक्षपदी राजेंद्र तुपे उपाध्यक्षपदी संतोष पुलाटे खजिनदारपदी किशोर आहेर तर सचिव पदी संजय तुपे यांची बिनविरोध निवड झाली आहे.

विद्यार्थ्यांमध्ये विविध कला गुण असतात. या कलागुणांना योग्य व्यासपीठ मिळावे हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून प्रवरा परिसर कला अध्यापक संघ हा कार्यरत आहे. या संघाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना विविध स्पर्धा त्याचबरोबर विविध कला क्षेत्रातील करिअरची माहित संघाच्या माध्यमातून दिली जाते.मागील अनेक वर्षापासून या संघाच्या माध्यमातून परिसरातील विविध विद्यार्थ्यांना या संघाच्या माध्यमातून व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात आले आहे.



> **निवड झालेल्या पदाधिकाऱ्यांची अभिनंदन**
>
> नूतन पदाधिकाऱ्यांचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के पाटील, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्ष शालिनीताई विखे पाटील, विखे पाटील कारखान्याचे अध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील, संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे पाटील, सहसचिव भारत घोगरे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. शिवानंद हिरेमठ, शिक्षण संचालक डॉ. प्रदीप दिघे, शिक्षण संचालिका लीलावती सरोदे आदींसह प्राचार्य, शिक्षक यांनी अभिनंदन केले आहे.

# केडगावमध्ये अल्पवयीन मुलीची आत्महत्या

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** केडगाव उपनगरातील देवी मंदिराच्या पाठीमागे राहणाऱ्या एका अल्पवयीन मुलीने गळफास लावून घेत आत्महत्या केल्याची घटना समोर आली आहे. आत्महत्या केलेल्या अल्पवयीन मुलीचे वय १६ होते. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

# प्रकल्पग्रस्तांनो, ७ जुलैपर्यंत प्रमाणपत्र सादर करा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहुरी खुर्द:** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी कार्यक्षेत्रातील अहिल्यानगर, नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगाव, पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर व सोलापूर या ठिकाणच्या प्रकल्पग्रस्तांच्या महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी या प्रकल्पाकरिता ज्यांच्या प्रत्यक्षात जमिनी संपादित झालेल्या आहेत, अशा प्रकल्पग्रस्त कुटुंबातील उमेदवारांसाठी सरळसेवेने रिक्त पदावर भरती संदर्भात दि. ३१ डिसेंबर, २०२४ रोजी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आलेली होती.

सदरील जाहिरातीसाठी विविध पदांकरिता अर्ज करण्यासाठी दि. ३० जानेवारी, २०२५ पर्यंत मुदत देण्यात आलेली होती. यानंतर पुन्हा दोन वेळेस मुदतवाढ देण्यात येवून दि. २४ मार्च, २०२५ पर्यंत अर्ज सादर करण्याची मुदत देण्यात आली होती.

अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकपर्यंत काही विद्यापीठ प्रकल्पग्रस्त यांना मुदतीत प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र न मिळाल्याने अशा प्रकल्पग्रस्त उमेदवारांनी संबंधित जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांचे कार्यालयास प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र मिळणेबाबत अर्ज सादर केल्याबाबतची पोहोच पावती त्यांचे अर्जासोबत सादर केली होती. अशा उमेदवारांना दि. ३० जून, २०२५ पर्यंत प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र सादर करण्याची संधी देण्यात आली होती.

दि. ३० जून, २०२५ रोजी मा मंत्री, कृषि यांच्या मंत्रालयातील दालनामध्ये झालेल्या बैठकीतील निर्देशानुसार विद्यापीठ प्रकल्पग्रस्त उमेदवारांना गट क व गट ड या दोन्ही गटातील पदांसाठी अर्ज करण्याची मुभा देण्यात आली असून त्यासाठी दि. ७ जुलै, २०२५ पर्यंत अर्ज सादर करण्यासाठी मुदतवाढ देण्यात आली आहे.

# गांधी पॉलिटेक्निकला उत्कृष्ट श्रेणी अभिप्राय

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीगोंदा :** बेलवंडी तालुका श्रीगोंदा येथील श्री छत्रपती शिवाजी शिक्षण संस्थेचे इंदिरा गांधी पॉलिटेक्निकमधील सिव्हिल, इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन, सायबर सिक्युरिटी आणि डव्हान्स डिप्लोमा इन सीएनसी मशीन या शाखेला महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२४-२५ साठी अति उत्कृष्ट व अति उत्तम श्रेणी प्रदान करण्यात आली आहे.

महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाच्या देखरेख समितीने महाविद्यालयास भेट दिली व



त्या अंतर्गत महाविद्यालयाचे कामकाज व सुविधांची तपासणी करून ही श्रेणी प्रदान केली. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष राजेंद्र नागवडे, व्हा. चेअरमन बाबासाहेब भोस, सर्व संचालक मंडळ, निरीक्षक सचिनराव लगड सर यांनी प्राचार्य, विभाग प्रमुख, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

महाविद्यालयाचे प्राचार्य प्रशांत भोईटे, अकॅडमीक कॉर्डिनेटर संदीप नातु, विभाग प्रमुख हवालदार ), इथापे, शिंदे सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी महाविद्यालयाच्या कामकाजाबाबत समाधान व्यक्त केले आहे.

# पेरणी झाली, आशा उगवली मात्र पाऊसच पडेना?

## निसर्गाने पुन्हा फिरवली पाठ; गंगापूर-वैजापूर कालव्यातून ओव्हरफ्लोचे पाणी सोडा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**गंगापूर :** पावसाळा म्हणायला एक महिना उलटून गेला. आभाळ काळवंडतं, ढग गरजतात, पण गंगापूर तालुक्याच्या मातीत पावसाचा थेंबही शिरत नाही. हातात कर्जाचे बोळे आणि उरात आशेचे जिवंत श्वास घेऊन शेतकरी पेरणी करतो. पण या आशेवरचं आभाळच आता फाटायला लागलं आहे.

गंगापूर तालुक्यातील हजारो शेतकरी या संकटाशी दोन हात करत आहेत. जून महिन्यात जेमतेम पावसाचे दोन-चार शिडकावे झाले, आणि शेतकरी



वर्गाने आपल्या भाग्याचा विश्वास धरत पेरणी केली. पण निसर्गाने पुन्हा एकदा पाठ फिरवली, आता त्या माळ्यांवर केवळ उन्हाचं तांडव आहे. उगवलेलं पीक कोमेजलंय.

सर्वसामान्य लोकांसाठीही परिस्थिती फारच बिकट आहे. वाहेगाव,अशा गावांमध्ये अजूनही पाण्याचा एक घोट मिळवण्यासाठी टँकरच्या रांगा लावाव्या लागतात. एकीकडे पाणीही नाही, दुसरीकडे शेतीही करपली. ही दुहेरी कोंडी सामान्य शेतकऱ्याला गुदमरवून टाकते आहे.

कालव्याची वाट पाहणारे डोळे आता थकले आहेत. उपविभाग नादूर मधमेश्वर येथील कालवा विभागाकडे उ.बा.ठा. गटाचे अधिकृत निवेदन देऊन ही मागणी लावून धरली आहे. जर हे पाणी शेतकऱ्यांपर्यंत पोहचले, तर किमान उरलेली शेती वाचेल व माणसांचा जीव वाचेल.

> गंगापूर-वैजापूर परिसरात यंदा पावसाचे प्रमाण खूपच कमी आहे. याआधीही नांदूर-मध्यमेश्वर कालव्यातून पाणी सोडण्यात आले होते, मात्र त्यावेळी पाण्याच्या वाटपात अन्याय झाला होता. त्यामुळे अनेक शेतकऱ्यांना पुरेसं पाणी मिळालंच नाही. सध्याच्या परिस्थितीत तरी कालव्यातून पाणी सोडताना रोटेशन पद्धतीने आणि न्याय्य वाटप सुनिश्चित करणे आवश्यक आहे. सर्व शेतकऱ्यांना समान हक्काने पाणी मिळावं, हीच आमची मागणी आहे.
>
> **– नागेश चौधरी**

# चाणक्य नीतीचा अवलंब करून जीवन समृध्द बनवा

## तहसिलदार सावंत; संजीवनी युनिव्हर्सिटीमध्ये बी. टेक. नवगतांचे स्वागत

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव** : विद्यार्थ्यांनी चाणक्यनीती नुसार बकोध्यानं, काकचेष्टा, श्वाननिद्रा, अल्पाहारी व गृहत्यागी या पंचसुत्रीचा अवलंब केल्यास ते आपल्या ध्येयापर्यंत जावुन त्यांचे जीवन समृध्द होईल. विद्यार्थी दशेतील उर्जा प्रचंड असते, मात्र या उर्जेला योग्य दिशेने वळवा, असा सल्ला कोपरगांवचे तहसिलदार महेश सावंत यांनी दिला.

संजीवनी युनिव्हर्सिटी अंतर्गत स्कूल ऑफ इंजिनिअरींग अँड टेक्नॉलाजी मध्ये इ. १० वी नंतर सहा वर्षे अभ्यासक्रमाच्या कॉम्प्युटर सायन्स अँड. इंजिनिअरींगला नव्याने प्रवेश घेतलेले विद्यार्थी व त्यांच्या पालकांच्या स्वागत समारंभात सावंत प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते. विद्यापीठाचे प्रसिडेंट अमित कोल्हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. यावेळी आय सोर्स इन्फोसिस्टिम प्रा. लि. च्या कार्पोरेट हेड व ट्रेनर श्रीमती मंजिरी कुलकर्णी, विद्यापीठाचे व्हाईस चांसलर डॉ. ए.जी. ठाकुर, डीन डॉ. कविथा राणी पी., आदी व्यासपीठावर उपस्थित होते. प्रारंभी डॉ. ठाकुर व डॉ. कविथा राणी पी. यांनी उपस्थितांचे स्वागत करून कोर्सबद्दल माहिती देत नियमावली सांगीतली तसेच भविष्यातील संधी सांगितल्या.

अध्यक्षस्थानावरून बोलताना अमित कोल्हे म्हणाले की, सुमारे ४२ वर्षांपूर्वी स्व. शंकरराव कोल्हे यांनी ग्रामीण भागातील मुला मुलींच्या शिक्षणासाठी संजीवनी संकुलाची स्थापना केली. त्यामुळे आज जगभर संजीवनीचे माजी विद्यार्थी कार्यरत आहेत. संस्थेचे अध्यक्ष नितिनदादा कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली संजीवनी अंतर्गत विविध संस्था वाटचाल करीत आहेत. त्यांच्या संकल्पनेतुन येथिल प्रत्येक बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांने तीन पर्यायांपैकी एक पर्याय निवडून स्वावलंबी व्हावे, यासाठी प्रयत्न केले जातात.



सावंत यांनी पंचसुत्रीचे विश्लेषण करीत या पंचसुत्रीचा विद्यार्थ्यांनी कसा अवलंब करावा, हे स्पष्ट केले. बकोध्यानं म्हणजे बगळा पाण्यात एक पायावर उभा राहतो व मासा पकडण्यावर लक्ष ठेवतो, तसे विद्यार्थ्यांनी आपल्या ध्येयावर लक्ष केंद्रित केले पाहिजे. काकचेष्टा म्हणजे कावळा नवीन जाणून घेण्याची तिव्र इच्छा ठेवतो, तसे विद्यार्थ्यांनी हिताच्या नवीन बाबी माहिती करून घेणे गरजेचे आहे. श्वाननिद्रा म्हणजे कुत्र्याप्रमाणे झोपा अर्थात कुत्रा झोपेत सुध्दा संवेदनशील असतो आणि काही वाटलेच तर लागलीच जागा होतो, तसे सतत जागरूक रहा आणि सजग ज्ञान मिळवा.

# राहाता तहसीलदारांकडून लाभार्थ्यांना योजनांचे वाटप

**जनता आवाज वृत्तसेवा**



**राहाता** : पालकमंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांच्या प्रयत्नातून तालुक्यातील कोऱ्हाळे येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर कार्यक्रम तहसिलदार अमोल मोरे यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. यामध्ये राहाता तहसीलदार यांच्याकडून विविध दाखले तसेच विविध योजनांचे वाटप लाभधारकांना करण्यात आले.

यामध्ये संजय गांधी, इंदिरा गांधी, मयत वारसांच्या नोंदी, ७/१२ प्रशस्ती पत्रांचे वाटप, वृद्धापकाळ, विधवा, अपंग योजना, श्रावण बाळ योजना, जात प्रमाणपत्र आदी योजनांमध्ये समावेश झालेल्या लाभाधरकांचे नावे प्रकाशित करण्यात आहे. त्यामुळे यामधील काही लाभार्थ्यांना आता १५०० रू. महिना चालू होणार आहे, तसेच काहीना दाखले मिळाल्याने शासकीय कामे होणार आहेत. कार्यक्रमासाठी राहाता तहसीलदार अमोल मोरे, नायब तहसिलदार मुळे, मंडळ अधिकारी मस्के, कोऱ्हाळे सरपंच पूजा झिंजुर्डे, तलाठी गणेश कांगणे, कोऱ्हाळे गतलाठी अपर्णा शीलावंत, उपसरपंच नितीन बोऱ्हाडे, ग्रामपंचायत सदस्य कानिफ कणसे, किरण मुर्तडक, अरुण डांगे, योगेश चांगले, अशोक डांगे, मारुती भांबरे उत्तम डांगे आदी मान्यवर उपस्थीत होते.

# शहरात रस्ता पॅचिंगच्या कामाला सुरुवात

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : मध्यवर्ती शहरात काही प्रमुख रस्त्यांच्या काँक्रीटीकरणाची कामे सध्या सुरू आहेत. मात्र, ज्या भागात कामे प्रस्तावित नाहीत, अशा ठिकाणी खड्डे बुजवण्याचे आदेश देण्यात आले होते. त्यानुसार महानगरपालिकेच्या बांधकाम विभागाकडून विविध रस्त्यांवर पडलेले खड्डे बुजविण्यासाठी पॅचिंगचे काम सुरू करण्यात आले असल्याची माहिती आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी दिली.

महानगरपालिकेकडून दरवर्षी मे महिन्यात रस्ता पॅचिंगची कामे केली जातात. यावर्षी मे महिन्यात अवकाळी पावसामुळे हे काम रखडले होते. गेल्या काही दिवसांपासून पावसाने उघडीप दिल्यामुळे खड्डे बुजविण्यासाठी



तातडीने काम सुरू करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. त्यानुसार कामाला सुरुवात करण्यात आली आहे. शहरातील कोर्ट गल्ली, आनंदी बाजार, सबजेल चौक, हातमपुरा, जुना मंगळवार बाजार, कापड बाजार, गंज बाजार, बुरुडगल्ली, चौपाटी कारंजा, अर्बन बँक चौक, डाळ मंडई, नालेगाव, मंगळगेट, सर्जे पूरा रस्ता अशा विविध ठिकाणी रस्त्यावरील खड्डे बुजवण्याचे काम सुरू करण्यात आले आहे.

शहराच्या मध्यवर्ती भागात प्रमुख रस्त्यावर रस्ता काँक्रीटीकरण सुरू आहे. तेथील ड्रेनेज लाईनची कामे पूर्णत्वास आहेत. या ठिकाणी अतिक्रमणे काढून काँक्रीटीकरणाची कामे सुरू करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. या कामांना गती देण्याचे आदेश देण्यात आले आहेत. टप्प्याटप्प्याने ही कामे पूर्ण करण्यात येत असल्याचे आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी सांगितले.

# संगमनेरच्या बाजारात ड्रॅगनची आवक वाढली

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर** : *संगमनेर कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये ड्रॅगन फ्रूटची मोठ्या प्रमाणात आवक होत आहे. मंगळवारी (दि. १) संगमनेरबरोबरच अकोले, राहाता, सिन्नर या तालुक्यांतील शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात ड्रॅगन फ्रूट, पेरू विक्रीसाठी येथील बाजार समितीमध्ये आणले होते, अशी माहिती बाजार समितीचे सचिव सतीश गुंजाळ यांनी दिली.*

*ड्रॅगन फ्रूटला किमान ५० ते कमाल ८० रुपये किलो भाव मिळाला. तसेच डाळिंबाची २,६८८ कॅरेट आवक होऊन त्यास प्रतिकिलो कमाल शंभर ते किमान २५१ रुपयांपर्यंत*



*भाव मिळाला. सध्या बाजार समितीमध्ये ड्रॅगन फ्रूट, पेरू, डाळिंब, कांदा, टोमॅटो आदी शेतमालाची खरेदी-विक्री सुरू असून शेतकऱ्यांना हक्काची बाजारपेठ उपलब्ध आहे.*

*बाजार समितीच्या विकासाकडे ड्रॅगन फ्रूटला ८० रुपये किलो ड्रॅगन फ ुटला किमान भाव मिळाला .*

*माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांचे विशेष लक्ष असून त्यांनी कायम शेतकरी हित जोपासले आहे, त्यांचे शेतकऱ्यांनी विशेष आभार मानले, असे बाजार समितीचे सभापती शंकरराव खेमनर यांनी सांगितले. शेतकऱ्यांनी ड्रॅगन फ्रूट, पेरू, डाळिंब त इतर शेतमाल प्रतवारी करून बाजार समि तीमध्ये आणावा जेणेकरून योग्य भाव मिळेल, असे आवाहन बाजार समितीचे सभापती खेमनर, सचिव गुंजाळ यांनी केले आहे.*

*संगमनेर बाजार समितीम ध्ये ड्रॅगन फ्रूट आणि इतरही फळांची मोठी आवक होत आहे.*

# बेलापूरच्या उपसरपंचपदी नवले यांची निवड

**जनता आवाज वृत्तसेवा**

**बेलापूर** : तालुक्यातील सर्वात मोठ्या बेलापूर ग्रामपंचायतीच्या उपसरपंच पदावर जलसंपदा तथा पालकमंत्री नामदार राधाकृष्ण विखे पा. यांचे नेतृत्वाखालील तसेच जिल्हा परिषद सदस्य शरद नवले व बाजार समितीचे माजी उपसभापती अभिषेक खंडागळे यांच्या मार्गदर्शना खालील गावकरी मंडळाचे चंद्रकांत नवले(आबा) यांची बिनविरोध निवड झाली.



गावकरी मंडळाने सरपंच पद राखीव असल्याने समाजातील अन्य घटकांना प्रतिनिधित्व देण्याच्यादृष्टिने उपसरपंच पदावर सर्व समाज घटकांना संधी देण्याचे धोरण अवलंबविले. त्यानुसार चंद्रकांत नवले यांना उपसरपंच पदाची संधी देण्यात आली. सरपंच मिना साळवी यांचे अध्यक्षतेखाली व ग्रामपंचायत अधिकारी निलेश लहारे यांचे उपस्थीतीत झालेल्या बैठकीस अभिषेक खंडागळे, स्वाती अमोलिक, मुश्ताक शेख, तबसुम बागवान, प्रियंका कुऱ्हे, उज्वला कुताळ, वैभव कुऱ्हे, सुशिलाबाई पवार, रमेश अमोलिक, भरत साळुंके आदी सदस्य उपस्थित होते. निवडीनंतरच्या आभार सभेत जि. परिषद सदस्य शरद नवले, बाजार समितीचे माजी उपसभापती अभिषेक खंडागळे, प्रफुल्ल डावरे, स्वाती अमोलिक,शांतीलाल हिरण, मोहसीन सय्यद यांनी मनोगत व्यक्त केले.

उपसरपंच पदासाठी श्री. नवले यांचा एकमेव अर्ज दाखल झाला. त्यावर सूचक म्हणून अभिषेक खंडागळे हे होते.त्यामुळे चंद्रकांत नवले यांची बिनविरोध निवड जाहीर करण्यात आली. सरपंच मीना साळवी यांच्या निवडी प्रमाणेच ही देखील निवड बिनविरोध झाल्याने शरद नवले, अभिषेक खंडागळे, प्रफुल्ल डावरे प्रणित गावकरी मंडाळाने ग्रामपंचायतीत निर्विवाद राजकीय वर्चस्व सिध्द केल्याचे मानले जाते.

# क्रेडाई अहिल्यानगरच्या संचालक मंडळाचे पदग्रहण

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : बांधकाम क्षेत्रात देशपातळीवरील प्रतिष्ठित क्रेडाई संघटनेच्या महाराष्ट्र राज्य शाखेची जनरल बॉडी मीटिंग शनिवारी अहिल्यानगरमध्ये झाली. यावेळी क्रेडाई, महाराष्ट्रचे अध्यक्ष प्रफुल्ल तावरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

राज्यभरातील ६० शहरांतील तीनशेहून अधिक बांधकाम व्यावसायिक आणि विकासक या बैठकीत सहभागी झाले होते, अशी माहिती क्रेडाई महाराष्ट्राचे सचिव आशिष पोखरणा यांनी दिली. शासन दरबारी मांडण्यात येणारे प्रश्न, बांधकाम क्षेत्रातील नवनवीन बदलांची माहिती व त्याची दिशा तसेच राज्य भविष्यातील कामकाजाचे नियोजन यावर बैठकीत चर्चा करण्यात आली.

अहिल्यानगर क्रेडाईच्या नव्या संचालक मंडळाचा पदग्रहण समारंभ आमदार संग्राम जगताप यांच्या उपस्थितीत पार पडला. यावेळी महापालिका आयुक्त यशवंत डांगे, क्रेडाई नॅशनलचे उपाध्यक्ष रणजीत नाईकनवरे उपस्थित होते. पुढील कालावधीसाठी संघटनेची धुरा गिरीश अग्रवाल यांच्या नेतृत्वाखालील नवनियुक्त संचालक मंडळावर सोपविण्यात आली. सचिव दीपक बांगर यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी नव निर्वाचित पदाधिकारी, उपाध्यक्ष सागर गांधी, प्रसाद आंधळे, अमित वाघमारे, विक्रम जोशी, कमलेश झंवर, मयूर कोठारी, राजेंद्र पाचे, अमित फिरोदिया, अनिल गांधी, अ‍ॅड. संदीप भापकर आदींनी विशेष परिश्रम घेतले. अ‍ॅड. जयंत भापकर, संजय गुगळे यांनी मार्गदर्शन केले. युथ विंगचे अध्यक्ष धवल इंगळे, साक्षी मुथा यांचेही सहकार्य लाभले.

# महावितरणच्या अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : तेरा वर्षीय सृष्टी गणेश दुर्गीष्ट या अल्पवयीन मुलीस विजेचा शॉक लागून तिचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची घटना वाकोडी रोडवरील चाहूराणा खुर्द येथील गोरे मळा येथे १३ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी घडली होती. तिच्या मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी महावितरणच्या अधिकारी - कर्मचाऱ्यांविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबत मयत मुलीचे वडील गणेश बबन दुर्गीष्ट (वय ३६, रा. गोरे मळा, चाहुराणा खुर्द, वाकोडी रोड, नगर) यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, फिर्यादी हे कुटुंबासह राहत असून, घरासमोर असलेला विजेचा खांब झुकलेला असून त्यावर विद्युत तारा खाली झूलतात. याबाबत फिर्यादी यांनी महावितरणच्या अधिकाऱ्यांना तोंडी तक्रारी केल्या होत्या, मात्र कोणतीही कारवाई झाली नाही. फिर्यादी यांची मुलगी सृष्टी ही १३ फेब्रुवारी रोजी सकाळी ८.४५ च्या सुमारास आजोबांना झोपेतून उठवण्यासाठी दुसऱ्या मजल्यावर गेली असताना, अचानक तिच्या काकीचे व आजोबांचे ओरडण्याचा आवाज आला. फिर्यादी यांनी धावत गॅलरीत जाऊन पाहिले असता सृष्टी गॅलरीत शांतपणे पडलेली होती.



फिर्यादी यांनी सृष्टीला तातडीने आनंदऋषी हॉस्पिटलमध्ये दाखल केले. तेथील डॉक्टर पारधे यांनी प्राथमिक तपासणीनंतर सांगितले की, सृष्टीला तीव्र विद्युत शॉक बसला आहे. तब्बल सहा दिवस उपचार घेतल्यानंतर, पुढील उपचारांसाठी तिला सिव्हिल हॉस्पिटल येथे दाखल करण्यात आले. मात्र, १९ फेब्रुवारी रोजी संध्याकाळी ६.३० वाजता उपचारादरम्यान सृष्टीचा दुर्दैवी मृत्यू झाला. फिर्यादी यांनी फिर्यादीत स्पष्टपणे म्हटले आहे की, हा मृत्यू केवळ व केवळ महावितरणच्या निष्काळजीपणाम ुळे झाला आहे. विजेचा खांब झुकलेला असल्याची वारंवार तक्रार करुन ही कुठलाही उपाय किंवा दुरुस्ती करण्यात आली नव्हती. त्यामुळे त्यांच्या निष्काळजी कारभारामुळे १३ वर्षीय मुलीचा जीव गमवावा लागला.

या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात महावितरणच्या नगर शहर विभागाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास कोतवाली पोलीस करीत आहेत.

# लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांना पाणी मिळणार

## जलसंपदा मंत्री विखे पाटील; कुकडीच्या डाव्या आणि घोडच्या कालव्यातून सुटणार आवर्तन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : कुकडीच्या डाव्या आणि घोडच्या डाव्या व उजव्या कालव्यातून खरीपासाठी काल गुरूवारी रात्रीपासूनच आवर्तन सोडण्याच्या जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी विभागाच्या अधिकाऱ्यांना दिल्या. त्यामुळे काल रात्रीपासून आवर्तन सुटणार असल्याने लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांना पाणी मिळणार असल्याचेही जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी सांगितले आहे.

दोन्ही कालव्यातून सोडण्यात येणाऱ्या आवर्तनाचा लाभ अहिल्यानगर आणि पुणे जिल्ह्यातील पाच तालुक्यातील सुमारे एक लाख हेक्टर क्षेत्राला होईल. सद्य परिस्थितीत धरणात उपलब्ध असलेल्या पाणी साठयाचा अंदाज घेवून ओव्हर फ्लोचे पाणी लाभ क्षेत्रातील गावांना देण्याबाबत मंत्री विखे

### ... आता शेवटच्या गावांना पाणी मिळणार

अहिल्यानगर जिल्ह्यातील श्रीगोंदा, पारनेर, कर्जत पुणे जिल्ह्यातील शिरूर आणि सोलापूर जिल्ह्यातील करमाळा तालुक्यांतील येणाऱ्या लाभक्षेत्रातील शेवटच्या गावांना पाणी मिळेल असे काटेकोर नियोजन विभागाच्या अधिकाऱ्यांनी करण्याच्या सूचना मंत्री विखे पाटील यांनी दिल्या आहेत.



पाटील यांनी मंत्रालयात विभागाच्या अधिकाऱ्यांसमवेत बैठक घेतली. त्यानूसार काल गुरूवारी रात्री पासूनच आवर्तन सोडण्याचे निर्देश त्यांनी दिले.

सद्यपरिस्थितीत लाभक्षेत्रात अपेक्षे इतका पाऊस झालेला नाही. त्यामुळे खरीपाच्या पेरण्यांना धोका होण्याचे गांभिर्य आहे. लाभक्षेत्रातील लोकप्रतिनीधी शेतकरी यांनीही आवर्तन सोडण्याच्या मागणीचा विचार करून जलसंपदा विभागाने आवर्तन सोडण्याच्या निर्णय केला.

# यंदाही मिळणार विद्यार्थ्यांना मोफत गणवेश

## शाळा व्यवस्थापन समितीमार्फत केली जाणार खरेदी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ मध्ये जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना मोफत गणवेश देण्यात येणार आहे. केंद्र शासनाच्या समग्र शिक्षा व राज्य शासनाच्या मोफत गणवेश योजनेची अंमलबजावणी शाळा व्यवस्थापन समिती मार्फत खरेदी केली जाणार आहेत.

केंद्र शासनाच्या समग्र शिक्षा कार्यक्रमांतर्गत शासकिय तसेच स्थानिक स्वराज्य संस्थाच्या शाळांमधील इ. १ ली ते ८ वी मधील शिक्षण घेत



असलेल्या सर्व मुली, अनुसुचित जाती व जमाती प्रवर्गातील मुले तसेच दारिद्र्य रेषेखालील मुले यांना मोफत गणवेश योजनेचा लाभ देण्यात येतो. शाळेची ओढ निर्माण होण्यासाठी व शाळेत शिक्षण घेण्यासाठी केंद्र व राज्य शासनाच्या मदतीने म ोफत गणवेश, बुट व पायमोजे, पाठ्यपुस्तके मोफत देण्याचे धोरण राबविले आहे. जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना शाळा व्यवस्थापन समितीने निवडलेले गणवेश, बुट व पाठ्यपुस्तके मोफत दिली जातात. मोफत गणवेश योजनेतंर्गत मिळणाऱ्या गणवेशाचा रंग व रचना संबधीत शाळा व्यवस्थापणन समिती मार्फत निश्चित जाणार आहे. तसेच ज्या शाळांमध्ये स्काऊट गाईड हा विषय आहे. त्या शाळेंनी गणवेशाची रंगसंगती निवडावी. स्काऊट गाईड हा गणवेश देखील शाळेनी ठरविलेल्या रंगसंगतीनुसार शाळा व्यवस्थापन समिती खरेदी करतील.

विद्यार्थ्यांना देण्यात आलेले गणवेश हे विद्यार्थी नियमित परिधान करीत असल्यामुळे गणवेशाचे कापड चांगल्या प्रतीचे व विद्यार्थ्यांच्या अंगाला इजा न करणारे असावे. खरेदी करण्यात आलेले गणवेश हे शिक्षणाधिकारी व गटशिक्षणाधिकारी यांच्यामार्फत शाळेत तपासणी करणार आहे. कापड खालच्या प्रतीचे आढळुन आल्यास शाळा व्यवस्थापन समितीस जबाबदार धरणार आहेत.

# पंढरपूरसाठी जिल्ह्यातून २५० बसची सोय

**जनता आवाज वृत्तसेवा**



**अहिल्यानगर** : दरवर्षी प्रमाणे याही वर्षी पंढरपुर मधील आषाढी यात्रेसाठी राज्य परिवहन महामंडळाने अहिल्यानगर जिल्ह्यातील भाविकांसाठी २५० जादा बस गाड्यांची सोय केलेली आहे.तसेच जळगाव व धुळे जिल्ह्यातील प्रत्येकी ७५ या नुसार सुमारे ४०० बस जिल्ह्यातील भाविकांसाठी ऊपलब्ध केलेल्या आहेत.

या बस दिनांक २ ते १० जुलै या कालावधीत जिल्ह्यातील ११ बस आगारातून पंढरपूर येथील यात्रेसाठी ये-जा करण्यासाठी भाविकांना उपलब्ध असतील. अहिल्यानगर शहरातील बस या तारकपूर बस आगारातून उपलब्ध केल्या आहेत. बाकी बसेस संबधीत बस आगारातून उपलब्ध केलेल्या आहेत. भाविकांना आगाऊ बस आरक्षित करता येतील.

**आगार निहाय गाड्यांची संख्या-** तारकपुर- ४०, शेवगाव-२०, जामखेड- १८, श्रीरामपूर-२२, कोपरगाव-३०, पारनेर-१६, संगमनेर-२५, श्रीगोंदा-३०, नेवासा-१६, पाथर्डी-२०, अकोले- १३.

## संपादकीय


### बोलले अती, सत्तेची मस्ती

आणीबाणी लागू करण्याच्या घटनेला पन्नास वर्षे होत असताना भाजपने इंदिरा गांधी यांच्या काळातील अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या गळचेपीबद्दल टीका करायला सुरुवात केली असताना भाजपचे बबनराव लोणीकरांनी मात्र इतरांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर टीका करायला सुरुवात केली आहे. एका गावातील टीकाकारांवर बोलत असताना बबनरावांची जीभ घसरली. 'तुझ्या बापाला पेरणीचे पैसे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिले. तुझ्या आईला, बहिणीला व बायकोला लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून आम्ही पैसे देतो. तुमच्या अंगावरचे कपडे, बूट व चपला आहेत, ते आम्हीच दिले. ते कुचळवाड्यावर बसलेले पाच-सहा कारटे. त्यांच्या मायचा पगार बबनराव लोणीकरने केला. तुझ्या हातातील डबडे, तो मोबाइ देखील आमच्यामुळेच आहे. आमचेच पैसे घेतो आणि आमच्यावरच तंगड्या वर करतो. आमचंच घेतो आणि आम्हालाच बोलतो का? आमचं घेऊन आमच्याबद्दल लिहितोस का?' ही भाषा कुणा उडाणटप्पूची नाही, तर एका आमदाराची आहे. साधनशुचिता, संस्कृतीच्या गप्पा मारणाऱ्या पक्षाच्या आमदाराची ही भाषा आहे. सत्ताधारी पक्षावर टीका करणे हे विरोधकांचे आणि जनतेचेही काम आहे. चांगल्या कामाचे कौतुक आणि चुकीच्या कामावर टीका करण्यात गैर काहीच नाही. लोकशाहीनेच हा अधिकार सर्वांना दिला आहे; परंतु लोकशाही मार्गाने निवडून येऊन लोकशाही मूल्येच नाकारायची, हे चुकीचे आहे. निरंकुश सत्ता भ्रष्ट करते, असे म्हणतात. त्याचाच अनुभव येत आहे. ज्याने चोच दिली, त्याने चारा आणि पाणीही दिले, असे म्हणण्याचा आपल्याकडे प्रघात आहे. म्हणजे विधात्याने किंवा निसर्गाने प्रत्येक जीव, जंतूच्या जगण्याची व्यवस्था केली आहे. तिचे नियमन करण्याचे काम सरकारने करायला हवे.

सरकार नावाची संस्था ही जनतेच्या पैशातून चालत असते. कर रुपाने मिळणाऱ्या पैशाचे योग्य व्यवस्थापन करून, पायाभूत सुविधा निर्माण करण्याचे काम सरकारचे आहे. सरकार राजकीय पक्ष चालवतात. त्यामुळे सरकारने किंवा राजकीय पक्षाने केलेली कामे हा जनतेवर उपकार नसतो, तर त्यांची ती जबाबदारी असते. सरकारचा खर्च आणि आमदार, मंत्र्यांचे वेतन आणि अन्य सुविधाही जनतेच्या पैशातूनच होत असते. त्याचे भान राहिले नाही, की मग बबनरावांसारखे लोक दिवसाढवळ्या बरळायला लागतात. त्यांना वेळीच जागे करण्याची आवश्यकता आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सहा हजार रुपये शेतकऱ्यांना देतात, ही वस्तुस्थिती असताना ही रक्कमही मोदी किंवा सरकारच्या झोळीतील नाही, ती जनतेच्या करातील आहे. लाडकी बहिण योजनेतून महाराष्ट्र सरकार पैसे देते, हे ही खरे आहे; परंतु ते ही पैसे सरकारचे नाहीत, तर जनतेचेच आहेत. असे असताना आता बबनराव टीकाकाराच्या मुलाच्या आईला कुठून पगार देतात, मुलाची आई बबनरावांकडे नोकरीला आहे का, या प्रश्नाचे उत्तर मिळत नाही. सरकार कपडे देत नाही. मोबाईल देत नाही. बूट, चप्पल देत नाही. असे असताना बबनरावांना हा साक्षात्कार कुठून झाला, हा प्रश्नच आहे. जणू लोकांचे जगणे, मरणे आमच्याच हातात आहे, असे सांगण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. बबनरावांची ही भाषा बरी नव्हे. बबनरावांची आमदारकी जनतेमुळे आहे. त्यांच्या गाडीतील डिझेल जनतेमुळे. त्यांच्या विमानाचे तिकीट जनतेमुळे..नेतेगिरी जनतेमुळे.. विधानसभेतील स्थान जनतेमुळे..हे त्यांच्या लक्षात येत नाही. बबनरावांच्या वक्तव्याचे राज्यात पडसाद उमटले. भाजपवर टीकेचे प्रहार व्हायला लागले. त्यामुळे मुख्यमंत्र्यांना बबनरावांना समज द्यावी लागली. बबनरावांनी त्यानंतर माफी मागितली असली, तरी ती सशर्त आहे आणि त्यातही त्यांची मग्रुरी दिसते. शेतकऱ्यांचा बाप काढल्याने बबनरावांवर राज्यभरातून टीका होऊ लागली. भाजपच्या जल्पकांच्या फौजांनी इतरांवर केलेली टीका चालते आणि भाजपवर कुणी टीका केली, तर ती चालत नाही. 'सोशल मीडिया'वरून टीका करणाऱ्या तरुणांबद्दल बबनरावांनी वादग्रस्त वक्तव्य केले. वाद झाल्यानंतर चुकीचे बोललो नसलो, तरी शेतकऱ्यांची माफी मागतो असा शब्दात त्यांनी आखडती माफी मागितली. शेतकऱ्यांबाबत अशा प्रकारचे विधान करण्याचा अधिकार कोणालाही नसल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी म्हटले, तसेच त्यांना समज देऊ, असे सांगितले. सरकार शेतकऱ्यांसाठी ज्या योजना राबवते, त्या जनतेने दिलेल्या करातून राबवल्या जातात. असे असताना कृषिमंत्र्यांपाठोपाठ बबनरावांसारखे आमदार शेतकऱ्यांबद्दल अनुदार काढीत असतील, तर त्यांबद्दल त्यांना जाब विचारलाच पाहिजे. दोन दिवसांपूर्वीच बबनरावांनी मतदारांना इशारा देणारे वक्तव्य केले होते. ज्या मतदारांच्या जीवावर आपण निवडून येतो, त्यांनाच इशारा देण्यापर्यंत त्यांची मजल जाते. जालना तालुक्यातील बोरगावमध्ये लोणीकर यांच्या हस्ते मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेच्या आठ कोटींच्या सिमेंट काँक्रिट रस्त्याचे उद्घाटन झाले. या वेळी भाषणात त्यांनी गावकऱ्यांना इशारा दिला आहे. विधानसभेत मतधिक्य नसल्याने नाराज बबनरावांनी ग्रामस्थांना कानपिचक्या दिल्या आहेत. 'पाच वर्षांचे बलुतं, एक फुली द्या नाहीतर नका देऊ. तुम्ही मला नाही दिले, तरी पाच दहा कोटी मिळतील हे डोक्यातून काढून टाका, असे लोणीकर म्हणाले. मी एक दोन तीन वेळा पाहिल नंतर गावावर फुली मारील, असा इशारात त्यांनी गावकऱ्यांना दिला होता. त्यानंतर पुन्हा एकदा त्यांनी वादग्रस्त वक्तव्य केले होते. सगळ्यात मोठा मोर्चा मी येथे होऊ शकतो. अधिवेशनाच्या आधी जर मोर्चा झाला, तर २५ हजार लोक आणेल, ५० हजार लोक आणेल. तुम्ही सांगा देवेंद्र फडणवीस यांना आणू, तुम्ही सांगा चंद्रकांतदादा पाटलांना आणू, तुम्ही सांगा सुधीरभाऊंना आणू, कुणाला आणायचं? तुम्हाला वाटले, तर मग एखादी हिरोईन आणायची तर हिरोईन आणू. आणि नाही जर कुणी भेटले, तर तहसीलदार मॅडम हिरोईन आहेतच, त्या निवेदन घ्यायला येतील तुमचं,' असे वादग्रस्त वक्तव्य त्यांनी केले होते. सत्तेचे आणि श्रीमंतीच्या लोण्याचे अनेकांना अजीर्ण होते. त्यातले बबनराव. सरकारी योजना म्हणजे त्यांच्याच खासगी जहागिऱ्या वाटू लागल्या आहेत. त्यातूनच 'तुझ्या बापाला मोदींनी पेरणीसाठी सहा हजार रुपये दिले,' अशी मस्तवालपणाची भाषा त्यांच्या तोंडातून बाहेर पडू लागली आहे. जनतेच्या अंगावरचे कपडे, पायातील चप्पल-बूट आणि हातातील मोबाईल ही सगळी आमचीच कृपा असे सांगण्यापर्यंत या मंडळींची मजल गेली आहे. मोदी हे स्वतःला जनतेचा 'प्रधान सेवक' म्हणवून घेतात. मुख्यमंत्री फडणवीस हे स्वतःला 'मोदींचे नम्र सेवक' संबोधतात; पण त्यांच्या पक्षाची मंडळी मात्र स्वतःला 'जनतेचे सावकार' समजायला लागली आहेत.

# युद्ध सरले, विजय कोणाचा?

**दृष्टीक्षेप**
**– अजय तिवारी**



गेल्या १२ दिवसांपासूनच्या इराक-इस्त्रायल युद्धावर अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी युद्धबंदी झाल्याचे जाहीर केले. अर्थात त्यानंतरही दोन्ही राष्ट्रांनी एकमेकांवर हल्ला केला. इराणचे अणुबाँब नष्ट झाल्यामुळे युद्धबंदी करण्यात काहीच अडचण नाही, असे समजून इस्त्रायलनेही युद्धबंदी करण्यास संमती दिली. युद्धबंदी झाली, की नाही, हा वादाचा मुद्दा असला, तरी या युद्धात नुकसान, फायदा कोणाचा झाला, हे नीट उमगले नाही.

इस्त्रायलने १३ जूनच्या रात्री इराणवर अचानक हवाई हल्ला केला. त्यामुळे पश्चिम आशियात एक नवे युद्ध सुरू झाले. या एकाच हल्ल्यामुळे अणुयुध्दाच्या भीतीने त्रस्त असलेल्या शत्रूंमधील संघर्ष टोकाला पोहोचला. त्यात दोन्ही देशांनी एकमेकांवर प्राणघातक हल्ले केले. या हल्ल्यांमध्ये मोठ्या प्रमाणात जीवित आणि मालमत्तेचे नुकसान झाले; परंतु सुरुवातीच्या संघर्षात कोणीही मागे हटण्यास तयार नव्हते. युद्धाने १२ दिवसांमध्ये आगीचा वर्षाव केला. त्यात फक्त रॉकेटचा पाऊस, क्षेपणास्त्रांचा नाश, नागरिकांच्या किंकाळ्या आणि लष्करी तळांची राख उरली. इराणने इस्त्रायलच्या तेल अवीवसारख्या प्रमुख शहरांना लक्ष्य केले, तर इस्त्रायलने इराणी कमांड आणि अणु संरचना नष्ट करण्यात आपली सर्व शक्ती पणाला लावली. इराणच्या तीन अणुभट्टयांवरील अमेरिकेच्या हल्ल्यानंतर, इराणने कतारमधील अमेरिकन तळाला लक्ष्य केले. दरम्यान, अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दोन्ही देशांदरम्यान युद्धबंदीची घोषणा केली. युद्धबंदीची बातमी आल्यानंतर या संपूर्ण संघर्षात कोणत्या देशाचे किती नुकसान झाले हे तपासले जात आहे. इराण आणि इस्त्रायलमध्ये अलीकडेच सुरू झालेल्या बारा दिवसांच्या युद्धाने पश्चिम आशियातील राजकारण आणि सुरक्षिततेला हादरवून टाकले. दोन्ही देशांमधील हा संघर्ष एक सामान्य संघर्ष नव्हता. या युद्धात दोन्ही देशांनी आपल्याकडील सर्वात घातक शस्त्रांचा वापर केला. त्यामुळे दोन्ही देशांमध्ये प्रचंड विनाश झाला. हे युद्ध केवळ क्षेपणास्त्रे आणि ड्रोनपुरते मर्यादित नव्हते, तर सायबर हल्लेही झाले. अणु तळ आणि लष्करी तळांवर हल्ले झाले. या युद्धात इराणचे सर्वात मोठे नुकसान झाले.

१३ जून रोजी इस्त्रायलने 'रायझिंग लायन' नावाच्या गुप्त मोहिमेंतर्गत इराणच्या अनेक महत्त्वाच्या लष्करी आणि अणु तळांना लक्ष्य केले. त्यात किमान २०० हून अधिक इराणी सैनिक, तंत्रज्ज्ञ, शास्त्रज्ञ आणि वरिष्ठ 'रिव्होल्युशनरी गार्ड' अधिकारी मारले गेले. यात काही ज्येष्ठ शास्त्रज्ञांचाही मृत्यू झाला. याशिवाय अनेक तळ उद्ध्वस्त झाले. २३ जून रोजी एका मानवाधिकार गटाने सांगितले की इस्रायली हल्ल्यांमध्ये इराणचे किमान ९५० लोक मारले गेले असून ३,४५० जण जखमी झाले आहेत. वॉशिंग्टन येथील मानवाधिकार कार्यकर्त्यांच्या गटाने संपूर्ण इराणचे आकडे सादर केले आहेत. त्यांनी सांगितले की, मृतांमध्ये ३८० नागरिक तर सुरक्षा दलाचे २५३ कर्मचारी आहेत. इराणच्या आरोग्य मंत्रालयाने सांगितले की, इस्रायली हल्ल्यात सुमारे ४०० इराणी नागरिक मारले गेले आणि ३०५६ जण जखमी झाले. इराण संघर्षादरम्यान नियमित मृतांची संख्या देत नाही. भूतकाळातील मृतांची संख्याही हा देश कमी लेखत आहे. इस्रायली हल्ल्यात इराणचे अनेक शीर्ष लष्करी कमांडर, अणुशास्त्रज्ञ, नागरिक आणि आयआरजीसी प्रमुख मारले गेले. एक लाखांहून अधिक लोक तेहरानहून उत्तरेकडे पळून गेले. युद्धापूर्वी इराणची अर्थव्यवस्था ३.५ टक्के वाढीने चालत होती. जागतिक नाणेनिधी आणि 'ऑक्सफर्ड इकॉनॉमिक्स'ने युध्दामुळे ही वाढ ०.३ टक्क्यांपर्यंत घसरली, असे म्हटले. इराणच्या अर्थव्यवस्थेचा ६० टक्के भाग तेल आणि वायू निर्यातीतून येतो. बारा दिवसांच्या हल्ल्यात तीन प्रमुख तेल शुद्धीकरण कारखाने आणि पाइपलाइन्सचे नुकसान झाले. उत्पादन सुमारे ३५ टक्क्यांनी कमी झाले आणि सुमारे दहा अब्ज डॉलर्सचे निर्यात नुकसान झाले.

इराणने इस्त्रायलवर हजारो प्राणघातक हल्ले केले. यापैकी बहुतेक इस्त्रायलच्या मजबूत हवाई संरक्षण प्रणाली आयर्न डोम, डेव्हिड्स स्लिंग आणि एरो सिस्टीमने हवेतच नष्ट केले. तथापि, काही क्षेपणास्त्रे आणि ड्रोन निवासी भागात पडल्याने इस्त्रायलचेही लक्षणीय नुकसान झाले. २५ हून अधिक लोकांचा मृत्यू झाला आणि २०० हून अधिक जखमी झाले. रुग्णालये (सोरोका), निवासी इमारती, संरक्षण मंत्रालय, पायाभूत सुविधांचे मोठे नुकसान झाले. त्यात हजारो लोक तात्पुरते बेघर झाले. त्याच वेळी इराणच्या क्षेपणास्त्र हल्ल्यामुळे इस्त्रायलच्या 'वेझमन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स'चे मोठे नुकसान झाले आहे. हा इस्त्रायलसाठी एक मोठा धक्का मानला जात आहे. कारण येथे इस्त्रायलच्या अनेक मोठ्या प्रयोगशाळा होत्या, महत्त्वाचे संशोधक काम करत होते. इराणच्या क्षेपणास्त्र हल्ल्यात इस्त्रायलमध्ये सुमारे २५-३० लोकांचा मृत्यू झाला. तेल अवीव आणि हैफामध्ये एकूण २४ लोकांचा मृत्यू झाल्याची पुष्टी झाली. इराणी हल्ल्यात इस्त्रायलमध्ये २०० हून अधिक लोक जखमी झाल्याचे सांगण्यात येत आहे. तज्ज्ञांच्या अंदाजानुसार इस्त्रायलने युध्दकाळात दररोज ७२५ दशलक्ष डॉलर्स खर्च केले. हे एक अत्यंत महागडे युद्ध ठरले. हा संघर्ष आणखी काही दिवस चालू राहिला असता तर एकूण खर्च दरम हा १२ अब्ज डॉलर्सपर्यंत पोहोचला असता. याखेरीज इस्त्रायलमध्ये निवासी इमारती, संरक्षण मंत्रालय, पायाभूत सुविधांचे मोठे नुकसान झाले, हजारो लोक बेघर झाले. तेल शुद्धीकरण कारखाने, बंदरे, विमानतळ आणि गॅस क्षेत्रे प्रभावित झाली. उत्पादन, प्रवास आणि व्यापार ठप्प झाला.

युध्द संपत असताना इराणने कतारमधील अमेरिकेच्या अल-उदेद या लष्करी तळावर क्षेपणास्त्र हल्ला करून संपूर्ण जगाला आश्चर्यचकित केले. अमेरिकेने इराणच्या फोर्डो, नतान्झ आणि इस्फहान येथील अणुतळांवर केलेल्या हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून इराणने हा हल्ला केला; पण इराणने कतार आणि अमेरिकेला या हल्ल्याची आगाऊ माहिती दिली होती, असे नंतर सांगण्यात आले. त्यामुळे हा कोणत्या प्रकारचा हल्ला होता, असा प्रश्न निर्माण होतो. कतारमधील अमेरिकन हवाई तळावर इराणचा हल्ला केवळ प्रतिकात्मक होता. जीवित आणि मालमत्तेचे कमीत कमी नुकसान व्हावे म्हणून ही माहिती आगाऊ देण्यात आली होती. परिणामी, इराणची बहुतेक क्षेपणास्त्रे नष्ट झाली आणि त्यात कोणतीही जीवितहानी झाली नाही. अमेरिकेच्या हल्ल्यानंतर सूड उगवण्यासाठी इराणने हा हल्ला केला होता. याची पुष्टी अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केली. त्यांनी 'ट्रुथ सोशल'वर केलेल्या पोस्टमध्ये 'इराणचा प्रतिसाद 'कमकुवत आणि अपेक्षित' होता आणि आशा आहे की आता यापुढे द्वेष निर्माण होणार नाही', असे म्हटले. शिवाय आधीच हल्ल्याची माहिती दिल्याबद्दल ट्रम्प यांनी इराणचे आभार मानले. त्यामुळे एकही जीवितहानी झाली नाही आणि कोणीही जखमी झाले नाही. कदाचित आता इराण या प्रदेशात शांतता आणि सौहार्दाकडे वाटचाल करू शकेल आणि मी इस्त्रायलला शांततेचा मार्ग अवलंबण्यास सांगू शकेन, असे ते म्हणाले.

काही तासांनंतर ट्रम्प यांनी दुसऱ्या पोस्टमध्ये इराण आणि इस्त्रायल पूर्ण आणि कायमस्वरूपी युद्धबंदीवर सहमत झाले आहेत. पुढील सहा तासांत ती लागू होईल, अशी घोषणा केली, पण ट्रम्प यांचा हा दावाही आतापर्यंत खोटा ठरला आहे. इराण आणि इस्त्रायलमध्ये भयंकर युद्ध सुरू आहे. अमेरिकेने २२ जून रोजी इराणच्या अणुतळांवर हल्ला केला आणि हा 'एकदाचा हल्ला' असल्याचे आधीच सांगितले होते. त्यानंतर प्रत्युत्तर देण्यासाठी इराणवर दबाव होता. हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून कतारमधील अमेरिकन तळावर हल्ला करतानाही इराणला मोठे युद्ध नको होते, कारण त्याची अर्थव्यवस्था आधीच कमकुवत झाली आहे. म्हणूनच इराणने कतारमधील अल-उदेइद तळावर लक्ष्य केले. तिथे अमेरिकन लष्कराच्या सेंट्रल कमांडचे मुख्यालय आहे. कतारमध्ये हल्ला करण्यामागील आणखी एक कारण म्हणजे इराण आणि कतार यांच्यात चांगले संबंध आहेत. कतारने या भागात तटस्थ मध्यस्थाची भूमिका बजावली आहे. इस्त्रायल आणि हमास यांच्यातील चर्चेत कतारचीच मध्यस्थी यशस्वी झाली होती. हल्ल्यापूर्वी इराणने कतारला माहिती दिली. त्यानंतर कतारने त्याचे हवाई क्षेत्र बंद केले. अमेरिकेने गेल्या एका आठवड्यात अल-उदेइदवरून आपली बहुतेक विमाने हटवली. १९ जूनपर्यंत तिथे फक्त पाच अमेरिकन विमाने उरली होती. यावरून या हल्ल्यामागे मोठे नुकसान करण्यापेक्षा आपली ताकद दाखवणे हा इराणचा उद्देश होता, हे स्पष्ट होते. त्यामुळे कधी गंभीर तर कधी लुटुपुटुचे वाटणारे हे युध्द आटोक्यात आल्याचे दिसत आहे, मात्र त्यातून खरेच काही साध्य झाले का, हा प्रश्न उरतो. विशेषत: इराणने अमेरिकेच्या हल्ल्यापुर्वी आपले समृध्द युरेनियम हलवल्याचे म्हटले गेल्याने वास्तव गुलदस्त्यातच राहिले.

# निमगाव वाघात रंगणार साहित्यिकांचा मेळावा

## जगद्गुरु संत तुकाराम महाराज ग्रामीण मराठी साहित्य संमेलनाचे खा. लंकें हस्ते उद्घाटन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : नगर तालुक्यातील निमगाव वाघा येथे आषाढी एकादशी व राजर्षी शाहू महाराज जयंतीनिमित्त आयोजित जगद्गुरु संत तुकाराम महाराज ग्रामीण मराठी साहित्य संमेलनाच्या उद्घाटक म्हणून खासदार निलेश लंके यांची निवड करण्यात आली आहे.

गावातील परिवार मंगल कार्यालयात सकाळी ११ वाजता खासदार लंके यांच्या हस्ते संमेलनाचे उद्घाटन व पै. नाना डोंगरे व्यायाम शाळेच्या फलकाचे अनावरण केले जाणार आहे.



संमेलनाचे संयोजक तथा ग्रामपंचायत सदस्य नाना डोंगरे यांनी खासदार लंके यांना निवडीचे पत्र दिले. स्व. पै. किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ आणि धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने या संमेलनाचे आयोजन करण्यात आले असून, हे दुसरे ग्रामीण मराठी साहित्य संमेलन आहे.

### साहित्यिक व विचारवंत यांचे होणार व्याख्यान

जगद्गुरु संत तुकाराम महाराज ग्रामीण मराठी साहित्य संमेलनात राज्यभरातील ज्येष्ठ साहित्यिक व कवी उपस्थित राहणार आहे. यावेळी ज्येष्ठ साहित्यिक व विचारवंत यांचे परिसंवाद आणि व्याख्याने होणार आहेत. मध्य सत्रात कवी संमेलन रंगणार आहे.

# जामखेडातील नान्नज गाव कडकडीत बंद

**जनता आवाज वृत्तसेवा**

**जामखेड** : जामखेड तालुक्यातील नान्नज येथे संपूर्ण ग्रामस्थांच्या वतीने नान्नज गाव कडकडीत बंद ठेऊन निषेध नोंदवत आरोपीला अटक झालीच पाहिजे, हम सब एक है, बाहेरच्या लोंकाची दादागिरी खपवून घेतली जाणार नाही, अशा गावकऱ्यांनी घोषणाबाजी करून अरोपीस लवकरात लवकर अटक करून कठोर शासन करण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे. जर दोन दिवसात आरोपीला पोलिसांनी पकडले नाही तर रस्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा यावेळी नागरिकांनी दिला आहे.




भरदिवसा दुकानामध्ये सामान घेण्यासाठी आलेल्या अल्पवयीन मुलीचा गोडाऊनमध्ये मित्राच्या मदतीने मुलीचे हात व तोंड दाबुन तिच्यावर अत्याचार केला. याप्रकरणी एका अल्पवयीन मुलासह दोन जणांविरोधात जामखेड पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला असुन मुख्य आरोपी अजूनही फरार आहे.

जामखेड तालुक्यातील नान्नज येथे दि. २९ जुन रोजी एका व्यापारी दुकानदाराच्या अल्पवयीन मुलीवर भर दिवसा तिच्याच दुकानातील गोडाऊनमध्ये एका अल्पवयीन मुलासह दोघांनी अतिशय निंदणीय प्रकारे अत्याचार करून मुख्य आरोपी फरार झाला आहे. यानंतर पिडीत मुलीच्या कुंटुबीयाच्या वतीने जामखेड पोलीस स्टेशनला या संदर्भातील गुन्ह्याची नोंद करण्यात आली असून आरोपी पैकी एका अल्पवयीन मुलास ताब्यात घेण्यात आले आहे.

मात्र एक मुख्य आरोपी अद्याप फरार असून त्याच्या अटकेची मागणी पिडीत मुलीच्या कुंटुबीयासह नान्नज ग्रामस्थाच्या वतीने होत आहे. यासाठी नान्नज ग्रामस्थाच्या वतीने दि. २ जुलै रोजी संपूर्ण नान्नज गाव कडकडीत बंद ठेऊन निषेध नोंदवत आरोपीस अटक व कठोर शासनाची मागणी करण्यात येत आहे.

यावेळी आरपीआयचे जिल्हाध्यक्ष सुनील साळवे, महेंद्र मोहळकर, हनुमंत नाईक, दिलीप रजपुत, सद्दाम पठाण, राजु साठे, गोरख मोहळकर, बबडया दळवी, भुजंग दळवी यांच्या सहग्रामस्थ मोठ्या संखेने उपस्थित होते. पोलीस कर्मचाऱ्याच्या वतीने चोख पोलीस बंदोबस ठेवण्यात आला होता.

गावात घडणारे सर्व गुन्हे हे बाहेरून गावात येणाऱ्या गुंड प्रवृतीच्या लोका मुळेच घडतात लोक दहशतीमुळे गुन्हे दाखल करत नाहीत. त्यामुळे गावातील गुन्हेगारीत वाढ होत असून अत्याचाराची घटना ही त्याचेच एक उदाहरण आहे. त्यामुळे बाहेरून येणाऱ्याची दादागिरी व दहशत थांबली पाहीजे व येथून पुढे बाहेरच्या लोकांनी नान्नज गावात येऊन दहशत व कोणी दादागिरी केली तर आम्ही गावकरी सहन करून घेणार नाही.

**– सुनील साळवे, जिल्हाध्यक्ष**

पान १ वरून पान १ वरून पान १ वरून

## जिहादी प्रवृत्तीच्या लोकांना धडा शिकविणार

मोर्चे व काही ठिकाणी आरत्या करण्याकरिता महाराष्ट्रभर जात असतात. तेथे जात असताना काही ठिकाणी दोन धर्मातील वादविवाद असलेल्या मंदिरांमध्ये हिंदू जनसमुदाय सहित आरती अगर दर्शनाकरिता जात असतात. त्यामुळे त्यांना काही विशिष्ट धर्मातील लोकांनी जाणिवपुर्वक टार्गेट केले असल्याचे दिसून येते.

त्यामध्ये त्यांनी प्रसार माध्यमांवर त्यांच्या धर्माच्या बाजुने व जाणिवपुर्वक आमदार संग्राम जगताप यांच्या विरोधात चितावणीखोर वक्तव्ये केलेली आहेत. त्यामध्ये त्यांनी प्रसार माध्यमांसमोर आमदार संग्राम जगताप यांना आम्ही गर्दीतुन गोळी मारु असे वक्तव्ये केलेले आहे. त्यानंतर लगेचच काल आमदार संग्राम जगताप यांचे स्वीय सहायक सुहास शिरसाठ यांना त्यांच्या मोबाईलवर २ दिन के अंदर संग्राम को खतम करूंगा आशा आशयाचा टेक्स मेसेज अनोळखी व्यक्तीने केला आहे.

आम्ही समस्त सकल हिंदु समाज, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी यांच्या वतीने आपणास निवेदन देतो की काही विशिष्ट धर्माचे लोक हे जाणिवपुर्वक आमदार संग्राम जगताप यांना टार्गेट करुन त्यांच्या जिवाला काही धोका निर्माण होईल अशी वक्तव्ये करत असुन त्या चिथावणीतुन आमदार संग्राम जगताप यांच्या जिवितास निश्चितच आता धोका निर्माण झालेला आहे.

तसेच हे धमक्या देणाऱ्या लोकांपासुन त्यांच्या कुटुंबियांच्या जिवितास ही घातपात होण्याबाबत शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे धमकी देणारे व्यक्ती व त्यांना चिथावणी देणाऱ्या व्यक्ती यांच्यावर कठोरातील कठोर करवाई तातडीने करण्यात यावी. आमदार संग्राम जगताप यांची व त्यांच्या कुटुंबियांची संरक्षणाची जबाबदारी पोलिस प्रशासनाने घ्यावी. त्या करिता लागणाऱ्या आवश्यक उपाययोजना तातडीने करण्यात याव्या.

सुहास शिरसाठ यांच्या मोबाईलवर ज्या अनोळखी व्यक्तीने धमकी दिली त्या व्यक्तीला आणखी कोण मदत करत आहे किंवा त्याच्या संपर्कात अजुन कोण आहे का ? याबाबतीत ही योग्य तो तपास करण्यात यावा. अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर यांनी जिल्हा पोलीस अधिक्षक सोमनाथ घार्गे यांच्याकडे निवेद्नाद्वारे केली आहे

## अपप्रचार कराल, तर कारवाई करणार

खोटा, निराधार व श्रद्धाळू भावनांशी खेळ करणारा आहे.

याचप्रमाणे, अजय गौतम व गौतम खट्टर या व्यक्तींनी श्री साईबाबांविषयी त्यांच्या यूट्यूब चॅनेलवर प्रसारित केलेली आक्षेपार्ह व अपमानास्पद विधाने निषेधार्ह असून, संस्थानने त्यांच्याविरुद्ध कायदेशीर नोटीस बजावून, राहाता येथील न्यायालयात मानहानीचा दावा दाखल करण्यात आला होता. यावर न्यायालयाने या प्रकरणात अंतरिम आदेश देत संबंधित व्यक्तींना श्री साईबाबांविषयी कोणतीही बदनामीकारक किंवा अपमानकारक विधाने करण्यास मनाई केली आहे. श्री साईबाबा संस्थानचा संपूर्ण कारभार महाराष्ट्र शासन पारित श्री साईबाबा संस्थान विश्वस्थ व्यवस्थापन अधिनियम, २००४ नुसार पारदर्शकपणे व नियमबद्ध रीतीने केला जातो. संस्थानमध्ये येणाऱ्या देणग्यांचा उपयोग ५५० खाटांचे अद्ययावत हॉस्पिटल, आशियातील सर्वात मोठे प्रसादालय, शैक्षणिक संकुल, भक्तनिवास, आणि इतर सार्वजनिक हिताच्या उपक्रमांसाठी केला जातो. देणगी फक्त अधिकृत दानपेट्या व अधिकृत काउंटरवरच स्वीकारली जाते. इतर कोणतीही आर्थिक देवाणघेवाण केली जात नाही. संस्थानच्या तदर्थ समितीस ५० लाखांपर्यंतच्या खर्चाचे स्वातंत्र्य आहे. त्यापुढील सर्व खर्चांसाठी माननीय उच्च न्यायालयाची पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक आहे.

## साहेब, माव्यावरील कारवाईत सातत्य ठेवा

एक मावा विक्रेता दुचाकीवर येऊन मावा विकत आहे. त्यावर पोलिसांनी कारवाई करावी अशी मागणी नगरकरांमधून होत आहे.

शेवगाव, पाथर्डी, अहिल्यानगर आदी ठिकाणी छापा टाकून मावा विक्रेते व सुगंधी तंबाखू विक्रेत्यांवर करवाई करण्यात आली आहे. या तालुक्यामध्ये मोठ्या प्रमाणात मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. विशेष म्हणजे मावा विक्रेत्यांनी दुकाने बंद केली असून अहिल्यानगर शहरात घरून विक्री सुरू केली आहे. नेहमीच्या ग्राहकांना मावा विक्रेत्याने घरून मावा देण्यास सुरवात केली आहे. नेहमीच्या ठेप्यावर पत्ता साग्ण्यासाठी काही माणसांची नियुक्ती करण्यात आली आहे. घरून मावा विक्री करणार्यांवर कारवाई करावी अशी मागणी जोर धरत आहे.

**माव्याची अव्वाच्या सव्वादराने विक्री**

माव्याची सध्या अव्वाच्या सव्वादराने विक्री केली जात आहे. दहा रुपयांची पुडी ३० ते ४० रुपयांना विक्री केली जात आहे. जादा पैसे देऊनही मावा मिळत नाही. त्यामुळे मावा खाणारे बेचैन झालेले आहेत..

**गुटखा विक्रीवर कारवाई करा**

शहरासह जिल्ह्यातील पान स्टॉलवर सध्या गुटखा पुड्या विक्री केल्या जात आहे. त्यावर पोलिस प्रशासनाने कारवाई करणे गरजेचे आहे. परंतु तशी कारवाई होत नसल्याने सध्या गुटखा विक्री जोमात सुरू आहे. विशेष म्हणजे माव्यावर कारवाई सुरू झाल्यापासून गुटक्याच्या भावातही वाढ झालेली आहे.

## सहकारनगरीत उद्या विठू नामाचा गजर

सांप्रदायात मोठे योगदान राहिले. त्याच विचारांचा वारसा पुढे घेवून नव्या पिढीला अध्यात्मिक विचारांशी जोडण्याचा प्रयत्न या वारीतून करण्यात येत असल्याचे सांगितले. भव्य आशा रिंगण सोहळ्यात भगवे झेंडे घोडेस्वार आणि वारकरी वेषभूशेतील सर्व विद्यार्थी विद्यार्थीनीसह जिल्ह्यातील अध्यात्मिक क्षेत्रातील महंत किर्तनकार प्रवचनकार वारकरी तसेच प्रमुख देवस्थानाच्या दिंड्याच्या प्रतिनिधीसह रिंगण सोहळा अतिशय ऐतिहासिक आणि संस्मरणीय करणार आहेत.

# कोपरगाव शहरातील अनेक कामे प्रलंबित

## राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी मुख्याधिकाऱ्यांना दिले निवेदन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोळपेवाडी :** कोपरगाव विधानसभा मतदार संघातील गावांबरोबरच कोपरगाव शहरासाठी देखील आ. आशुतोष काळे यांनी नागरीकांना अपेक्षित असलेल्या विविध विकासकामांसाठी कोट्यावधी रुपयांचा निधी दिलेला आहे. परंतु या निधीतील अनेक कामे प्रलंबित आहेत तर काही कामांना तर अद्याप सुरुवात देखील झालेली नाही. त्यामुळे नागरीकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी मुख्याधिकारी सुहास जगताप यांना लेखी निवेदन देवून कोपरगाव शहराच्या विविध विकास कामांच्या प्रश्नाकडे लक्ष वेधले.



निवेदनात राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी असे म्हटले आहे की, आ. आशुतोष काळे यांनी केलेल्या अथक प्रयत्नातून राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री ना. अजितदादा पवार यांच्या अनमोल सहकार्यातून राज्य शासनाकडून कोपरगाव शहराच्या विविध विकासकामांसाठी कोपरगाव नगरपरिषदेस भरघोस निधी आणला आहे. या निधीतून बहुतांश विकास कामे पूर्ण होवून नागरीकांच्या अडचणी कमी देखील झाल्या आहेत. परंतु कोपरगाव नगरपरिषदेला मिळालेल्या निधीतील अनेक कामे अद्यापही प्रलंबित आहेत. त्याचा कोपरगाव शहरवासीयांना त्रास सहन करावा लागत असून त्याबाबत नागरीकांच्या अनेक तक्रारी आहेत. त्यामुळे ज्या विकासकामांना अद्याप सुरुवात होवू शकली नाही. त्या विकासकामांच्या संबंधित ठेकेदारास सूचना देवून ती विकासकामे तातडीने सुरु करावी.यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, माजी नगरसेवक व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सध्या पावसाळा सुरु असून पावसाळ्यापूर्वी करावयाची काही कामे अद्यापही झालेली नसल्याचे दिसून येत आहे. पावसाळ्यात होणाऱ्या दुर्घटना टाळण्यासाठी जीर्ण झालेल्या इमारती, वाऱ्यामुळे पडू शकणारे वृक्ष, रस्त्यात आडवे येणारे विजेचे पोल व वीजवाहिन्या आदी गोष्टींमुळे कोणत्याही प्रकारची हानी होणार नाही. यासाठी उपाय योजना कराव्यात. तसेच शहरातील मोठ्या गटारी व नाले सफाई, मोकाट जनावरे तसेच शहरातील स्वच्छतेसह नागरिकांच्या विविध प्रश्नांबाबत नागरिकांच्या तक्रारी आहेत.नागरिकांच्या तक्रारींची दखल घेवून तातडीने कार्यवाही करावी असे मुख्याधिकारी सुहास जगताप यांना दिलेल्या निवेदनात शेवटी म्हटले आहे.

## वावरथ जांभळी येथे एकास मारहाण; गुन्हा दाखल

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहुरी :** आमची मोटार बोअरवेलमध्ये सोड, मगच तुझी घोडीकप्पी घेऊन जा, असे म्हणून आरोपींनी एकास मारहाण केली. ही घटना सोमवारी (दि. ३०) रोजी सायंकाळी वावरथ जांभळी येथे घडली. आण्णा नामदेव हंडाळ (वय. ३२ रा. वातरथ जांभळी) हे इलेक्ट्रिक मोटार बोअरवेलमध्ये सोडण्याचे काम करतात. ते रविवारी (दि. २९ जून) तिखुले यांची इलेक्ट्रिक मोटार बोअरवेलमध्ये सोडण्यासाठी गेले होते. त्या ठिकाणी हंडाळ यांची घोडी कप्पी बिघडल्यानेकाम अधुरे राहिले.

दुसऱ्या दिवशी हंडाळ हे तिखुले यांच्या शेतात गेले. आणि घोडी कप्पी दुरुस्तीसाठी घेऊन जावी लागेल असे म्हणाले. त्यावेळी तु आमची मोटार बोअरवेलमध्ये सोडायचे काम पूर्ण कर, तरच तुझी घोडीकप्पी येथून घेऊन जा, असे म्हणून हंडाळ यांना मारहाण केली. याबाबत आण्णा नामदेव हंडाळ यांनी राहुरी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. यावरुन आरोपी बिरा नाथा तिखुले, धुळा नाथा तिखुळे, किशोर धुळा तिखुळे, दादू बिरा तिखुले, तसेच त्यांच्या कुटुंबातील तीन महिला (सर्व रा. वावरथ) यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# कंत्राटी कामगारांचे आंदोलन स्थगित

## तीन महिन्यात निर्णय घेण्याचे सरकारचे आश्वासन



**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी :** प्रधानमंत्री ग्रामसडक व मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत कार्यरत महाराष्ट्रातील ग्रामीण रस्ते विकास कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या मागण्यांकडे राज्य सरकारने सकारात्मक भूमिका घेतली असून, तीन महिन्यांत निर्णय घेण्याचे राज्य सरकारने आश्वासन दिल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले आहे.

२३ जूनपासून आझाद मैदान, मुंबई येथे सुरू असलेल्या आमरण उपोषणात अहमदनगर जिल्हाध्यक्ष रामदास बर्डे यांनी आठ दिवस अन्नत्याग करून आंदोलनाला दिशा दिली. त्यांना त्यांच्या संघटनेच्या अनेक कर्मचाऱ्यांनी राज्यभरतून पाठिंबा दिला. उपोषणा दरम्यान कर्मचाऱ्यांनी मोठी एकजूट दाखवली होती. २०१२ पासून वेतनवाढ न मिळणे, बाह्य यंत्रणांपेक्षा अर्धे मानधन मिळणे या मुद्द्यांना घेऊन त्यांनी सरकार दरबारी लढा उभारला होता.

### यांनी दिला होता पाठिंबा

या उपोषणादरम्यान बर्डे यांची प्रकृती खालावली होती. त्यांच्या आणि संघटनेच्या सहकाऱ्यांच्या संघर्षाची दखल घेत माजी उपमुख्यमंत्री उद्धव ठाकरे, खासदार सुप्रिया सुळे, खासदार संजय राऊत, आमदार जयवंत पाटील आणि आमदार रोहित पवार यांनी प्रत्यक्ष भेट घेऊन पाठिंबा दिला.राज्य सरकारने याप्रकरणी बैठक बोलावून तीन महिन्यात मागण्या पूर्ण करण्याचे आश्वासन दिले. त्यामुळे मंगळवारी आंदोलन मागे घेण्यात आले. यामुळे कंत्राटी कर्मचाऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

# 'चॅम्पियन करंडक' स्पर्धेत 'मराठा वॅरिअर' विजयी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**आहिल्यानगर :** वाकोडी येथील साईदीप अकॅडमीवर गेले १५ दिवस चाललेल्या चॅम्पियन करंडक सामन्यात आज मराठा वॉरिअर संघाने समर्थ अकॅडमी संघाचा पराभव करून विजेतेपद पटकावले.




मराठा वॉरियर संघाने प्रथम फलंदाजी करताना ४० षटकामध्ये ८ बाद २९१ धावा केल्या. यामध्ये करण धामणे याने तडफदार शतक झळकावले त्याने ११८ धावांची खेळी केली. त्याला प्रेम इघे याने सुंदर साथ देत ८० धावांची खेळ केली. तसेच प्रिन्स कुमार याने ३९ धावा करत चांगली साथ दिली. समर्थ संघाच्या आदित्य भापकर यांनी ४३ धावात तीन बळी घेतले. निमेश शिदोरे याने ५३ धावा देत बळी मिळवले. प्रत्युत्तर दाखल समर्थ संघाने ३९.५ षटकांमध्ये सर्व बाद १८८ धावा केल्या. यामध्ये सर्वाधिक धावा वरद भिसे यांनी ३६ धावा केल्या. रुद्र पवार याने २८ धावा केल्या. मराठा वॉरियर कडून सार्थक शिंदे यांनी ४३ धावात दोन बळी मिळवले तसेच प्रिन्स कुमार यांनी ३४ धावा दोन बळी मिळवले.

बेस्ट बॅट्समन, मॅन ऑफ द सिरीज देवाशिष संदीप घोडके याने ४ सामन्यांमध्ये ३७५ रन केले या स्पर्धेमध्ये देवाशिष घोडके याला उत्कृष्ट फलंदाज व सामनावीर म्हणून गौरविण्यात आले या स्पर्धेमध्ये एकूण आठ संघाने आपला सहभाग नोंदवला. ही स्पर्धा साखळी सामन्यांची केली गेली एका संघाला तीन सामने खेळल्यास मिळाले. आजच्या सामन्याला प्रमुख पाहुणे म्हणून दादा चौधरी विद्यालयाचे मुख्याध्यापक सुभाष येवले व उद्योजक व स्वामी मोबाईलचे संचालक संदीप पडोळे म्हणून लाभले.

## महाले ज्वेलर्समध्ये चोरी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर :** शहरातील मेन रोडवरील व्यावसायिकाकडे तारण ठेवलेले साडेचार लाख रुपयांचे सोने चोरीस गेले. दुकानातील कामगाराने सोने चोरून नेल्याप्रकरणी श्याम प्रकाश माळवे याने शहर पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.दुकानात २५ कामगार कार्यरत आहेत. यातील रोहित राजू शिंदे (रा. कुंभारगल्ली, ता. श्रीरामपूर) हा ग्राहकांना चहापाणी देण्याचे काम करतो. पोपट भगिरथ महाले यांच्याकडे सावकारकीचा अधिकृत परवाना आहे. ग्राहकाचे सोने तारण ठेवून त्यांना व्याजाने रक्कम देतात. मागील काही महिन्यांपासून तारण ठेवलेल्या दागिन्यांतील बरेचसे सोने-चांदीचे दागिने सापडत नव्हते. तेव्हा पाच महिन्यांचे रेकॉर्ड तपासले असता, तारण ठेवलेले सोने व रेकॉर्ड रूममध्ये तफावत आढळून आली. यानंतर, अमोल प्रकाश महाले यांनी कामगार राहुल देवेंद्र मिसाळ यांना ही माहिती दिली. दुकानातील कॅमेऱ्याचे फुटेज तपासले असता, रोहित शिंदे हा संशयास्पद हालचाली करताना दिसून आला. याची खात्री करण्यासाठी एक बनावट सोन्याची पोत रेकॉर्ड रूममध्ये ठेवण्यात आली. ३० जूनला रोहित याने ती पोत खिशात टाकून तो दुकानाबाहेर जाण्यासाठी निघाला. त्यावेळी त्यास पकडले आणि विचारपूस केली असता, त्याने गुन्ह्याची कबुली दिली. चोरलेले सोने सारिका सचिन खोमणे व तिचा भाऊ यांना विकल्याचे सांगितले. पोलिसांनी रोहित शिंदेसह सारीका खोमणे व तिचा भाऊ अशा तिघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

## दिलीप बोडखेला अटक

**राहुरी खुर्द :** शेतकऱ्यांना शासकीय अनुदानातून सोलर पंप मिळवुन देतो, असे खोटे सांगून श्रीरामपूर तालुक्यातील टाकळीभान तसेच राहुरी तालुक्यातील वेगवेगळ्या शेतकऱ्यांना फसवून त्यांच्याकडून पैसे घेणारा दिलीप बोडखे (रा. टाकळीभान ता. राहाता) यास राहुरी पोलिसांनी अटक केली आहे. सदर आरोपीवर शेवगाव, नेवासा पोलीस स्टेशन येथे तसेच महाराष्ट्रातील इतर ठिकाणी फसवणुकीचे अशाच प्रकार गुन्हे दाखल आहेत. तरी राहुरी तालुक्यातील शेतकऱ्यांना अव्हाण करण्यात येते की, अशाच प्रकारचे नमुद आरोपीने ज्या शेतकऱ्यांची फसवणुक केली आहे त्यांनी पोलीस स्टेशनला संपर्क करावा.सदरची कारवाई पोलिस अधिक्षक सोमनाथ घार्गे, अप्पर पोलिस अधिक्षक वैभव कलुबर्मे, उपविभागीय अधिकारी डॉ. बसवराज शिवपुजे, यांच्या सुचनेवरून पो. नि. संजय आर. ठेंगे यांचे नेतृत्वाखाली पोउपनि. राजु जाधव, पोहेकॉ. हनुमंत आव्हाड, पोकॉ. गणेश लिपने यांनी केली असुन गुन्ह्याचा पुढील तपास पोउपनि. राजु जाधव हे करत आहेत.

## 'एसएसजीएम' मध्ये कॅम्पस प्लेसमेंट ड्राईव्हचे आयोजन



**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव शहर :** कोपरगाव येथील रयत शिक्षण संस्थेच्या श्री सद्गुरु गंगागीर महाराज सायन्स, गौतम आर्ट्स अँड संजीवनी कॉमर्स कॉलेज कोपरगाव महाविद्यालयातील करिअर कौन्सिलिंग आणि प्लेसमेंट सेल, रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र, इलेक्ट्रॉनिक सायन्स, संगणक विज्ञान विभाग, आय. क्यू. ए. सी. व ''डायरेक्टोरेट ऑफ फॉरेन्सिक सायन्स लॅबोरेटरीज मुंबई'' या विभागाच्या संयुक्त विद्यमाने कॅम्पस प्लेसमेंट ड्राईव्हचे आयोजन केलेले होते.

सदर मुलाखतीसाठी डायरेक्टोरेट ऑफ फॉरेन्सिक सायन्स लॅबोरेटरीज मुंबई यांच्या वतीने सी. एम. एस. कॉम्प्युटर्स तर्फे योगेश बिरमोळे, जितेंद्र शिंत्रे आणि अतुल कुमार या तज्ञांची समिती आली होती. या कॅम्पस प्लेसमेंट ड्राईव्ह मध्ये एकूण १३४ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

या कॅम्पस प्लेसमेंट ड्राईव्हसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.माधव सरोदे यांनी मार्गदर्शन करून विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. सदर उपक्रमाचे प्रास्ताविक विज्ञान शाखेचे उपप्राचार्य डॉ. घनश्याम भगत यांनी केले. तर करियर कौन्सिलिंग आणि प्लेसमेंट सेलचे प्रमुख प्रा.दिलीप भोये यांनी उपस्थितांचे आभार मानले. सदर कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्रा.अरुण देशमुख यांनी विशेष प्रयत्न केले.

## वसंतराव नाईकांच्या कार्यातून राज्याला दिशा : दराडे

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी :** वसंतराव नाईक यांनी कृषी, सिंचन आणि औद्योगिक विकासाच्या माध्यमातून महाराष्ट्र राज्याच्या प्रगतीचा पाया घातला. त्यांच्या कार्याचा परिणाम म्हणूनच आज राज्य आर्थिकदृष्ट्या सक्षम व प्रगतशील आहे असे मत उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे तालुका अध्यक्ष भगवान दराडे यांनी व्यक्त केले.



हरितक्रांतीचे प्रणेते माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त पाथर्डी शहरात त्यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी दराडे बोलत होते. या कार्यक्रमास माजी नगरसेवक बंडू पाटील बोरुडे, समाजसेवक सिताराम बोरुडे, नवनाथ उगलमुगले, बाळासाहेब दराडे, हुमायून आतार, प्रभाकर पवार, आर के चव्हाण,नवनाथ चव्हाण, किशोर राठोड, मोहन पवार,सुखदेव मर्दाने, संजय पवार, रंगनाथ चव्हाण, अंबर चव्हाण आदी मान्यवर उपस्थित होते.

दराडे पुढे म्हणाले, १९७२ च्या दुष्काळात महाराष्ट्राला भीषण अन्नधान्य संकटाला सामोरे जावे लागले होते. त्या वेळी नाईक साहेबांनी धोरणात्मक निर्णय घेत शेतीला चालना दिली. कृषी विद्यापीठांची स्थापना, जलसंधारण योजना, शेतकऱ्यांसाठी विविध सुधारणा हे सगळे त्यांच्या दूरदृष्टीचे फलित होते. त्यांनी विकासाचे जे बीज पेरले, त्याचे आज वटवृक्ष झाले आहेत.

## जैवविविधततेसाठी वृक्ष लागवड गरजेची : डॉ. खरबडे



**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहुरी खुर्द :** जैवविविधता जपण्यासाठी जास्तीत जास्त वृक्ष लागवड करणे गरजेचे आहे. वृक्षारोपणामुळे मातीची धूप थांबून पावसाचे पाणी जमिनीत मुरण्यास मदत होते. यामुळे जमिनीतील पाणी पातळी वाढते, असे प्रतिपादन महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे अधिष्ठाता डॉ. साताप्पा खरबडे यांनी केले.

महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. शरद गडाख यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यापीठांतर्गत असलेल्या डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाच्या मृद व जलसंधारण अभियांत्रिकी विभागांतर्गत वनमहोत्सव २०२५ आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी वृक्षरोपण करतांना अधिष्ठाता डॉ. साताप्पा खरबडे बोलत होते. यावेळी संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के, विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे, कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. रविंद्र बनसोड, मृद व जलसंधारण अभियांत्रिकी विभाग प्रमुख डॉ. सचिन नांदगुडे, विभाग प्रमुख डॉ. सचिन नलावडे उपस्थित होते.याप्रसंगी डॉ. विठ्ठल शिर्के, डॉ. गोरक्ष ससाणे, डॉ. रविंद्र बनसोड यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. कार्यक्रमाचे स्वागत व आभार डॉ. विरेंद्र बारई यांनी केले. कार्यक्रम घडवून आणण्यामध्ये डॉ. संगिता शिंदे, सुनील साळुंके, संतोष कहार, राहुल राजपुत व ज्ञानेश्वर मोरे यांनी परिश्रम घेतले.डॉ. सचिन नांदगुडे म्हणाले की, या पाणलोट क्षेत्राचा परिसर १२०० हेक्टरचा आहे. या १२०० हेक्टरवर पाणी साचवून ठेवण्यासाठी खोल सलग समतल चर, बंदिस्त वाफे, नाला बंडींग करण्यात आलेले असून त्यामुळे या क्षेत्रात १२३.४० टी.सी.एम. पाणी अडवले व जमिनीत मुरवले जात आहे. या पाणलोट क्षेत्रामध्ये यावर्षीच्या वनमहोत्सवात एक हजार झाडांची लागवड करण्यात येणार आहे. यामध्ये ६०० बांबू व आवळा, जांभूळ व आंबा या ४०० झाडांचे वृक्षारोपण करण्यात येणार आहे.

# पंढरपूर दिंडी सोहळ्यात ५०० युवक व युवतींचा सहभाग

## डॉ. जयश्री थोरात यांचे नेतृत्व; आरोग्यासह वारकऱ्यांची सेवा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर :** वारकरी संप्रदायाच्या विचारांची पाईक असलेले महाराष्ट्राचे वरिष्ठ नेते तथा माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली युवक काँग्रेसच्या अध्यक्षा कॅन्सरतज्ञ डॉ. जयश्रीताई थोरात यांच्या नेतृत्वात संगमनेर तालुक्यातील ५०० युवक कार्यकर्त्यांनी पंढरपूरच्या पायी वारी दिंडीमध्ये सहभाग घेतला असून आरोग्यासह वारकऱ्यांच्या दोन दिवस विविध सेवा दिली आहे.



महाराष्ट्राचे कुलदैवत असलेल्या पंढरीच्या पांडुरंगाच्या दर्शनासाठी आषाढी एकादशीनिमित्त महाराष्ट्रातील अनेक पायी दिंडी या पंढरपूरकडे येत आहेत. या दिंडीतील वारकऱ्यांच्या सेवेसाठी डॉक्टर जयश्रीताई थोरात यांच्या नेतृत्वाखाली संगमनेर शहर व तालुक्यातील ५०० तरुण व तरुणींनी या पायी दिंडी सोहळ्यामध्ये आम्ही संगमनेरी, विठुरायाचे वारकरी या उक्ती खाली सहभाग घेतला.संगमनेर, अहिल्यानगर मार्गे या दिंडीने संत निवृत्तीनाथ महाराज पालखीचे टेंभुर्णी येथे दर्शन घेऊन येथील वारकऱ्यांची आरोग्य तपासणीसह स्वच्छता, जेवण वाढणे, यांसह इतर सेवा दिली. या दिंडीमध्ये अहिल्यानगर जिल्ह्यासह उत्तर महाराष्ट्रातील आणि पायी दिंड्या सहभागी झाले आहेत. या ७० किलोमीटरच्या प्रवासात ठिकठिकाणी वारकऱ्यांशी संवाद, मुक्काम, स्वयंपाकांमध्ये सहभाग, वाढण्यामध्ये सहभाग, स्वच्छता अभियान, आरोग्य तपासणी यांसह डॉ. थोरात यांनी वारकऱ्यांशी मुक्त संवाद साधला. डॉ. जयाताई थोरात म्हणाल्या की, सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात व माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी कायम वारकरी संप्रदायाची विचारधारा जोपासली आहे. मानवता हा धर्म जोपासणारा वारकरी विचार असून यामध्ये लहान, मोठा, उच्च , जात पाहत असा कोणताही भेदभाव नाही. सर्वजण माऊली म्हणून एकमेकांचा आदर करत आहेत.

### थोरात परिवाराला वारकरी संप्रदायाची परंपरा

थोरात परिवाराला समाजकार्याची व वारकरी संप्रदायाची मोठी परंपरा आहे. माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी कायम सर्वांना सोबत घेऊन समाज विकासाचे काम केले आहे आणि हीच शिकवण वारकरी संप्रदायाने दिली आहे. गोरगरिबांची सेवा करणे हीच खरी ईश्वर सेवा असून डॉ. जयश्रीताई थोरात यांच्या नेतृत्वात तरुणांनी वारीमध्ये सहभाग घेऊन सेवा दिली हा कौतुकास्पद उपक्रम असल्याचे ते म्हणाले. यावेळी खासदार निलेश लंके प्रतिष्ठानच्या वतीने वारकऱ्यांसाठी प्रसाद वाटपाच्या कार्यक्रमात या सर्व संगमनेरच्या वारकऱ्यांनी सहभाग घेतला.

## जाहीर समन्स

सिद्धेश्वर मजूर व सहकारी संस्था मर्या. अजमपूर, ता.संगमनेर, जि.अहिल्यानगर या संस्थेने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ३५ व नियम १९६१ चे नियम २८ व २९ व वार्षिक सर्वसाधारण सभेतील मंजूर ठरावानुसार खाली नमूद सभासदांचे सभासदत्व रद्द करणेबाबतचा प्रस्ताव या कार्यालयाकडे सादर केला आहे.त्यानुसार या कार्यालयाकडील दिनांक ०५/०६/२०२५ रोजीच्या नोटीसीन्वये दिनांक २६/०६/२०२५ रोजी सुनावणी ठेवण्यात येवून सुनावणी कामकाज पार पडलेले आहे. परंतु सदर नोटीसा काही सभासदांना बजावणी न झाल्याने अथवा सदर सुनावणीस सभासद उपस्थित न राहिल्याने व त्यांचे पत्ते उपलब्ध न झाल्याने सदरचे जाहीर समन्स देण्यात येत आहे.

| अ.क्र. | सभासदाचे नाव | अ.क्र. | सभासदाचे नाव |
|---|---|---|---|
| १. | श्री.तानाजी भानुदास सुपेकर | ६. | श्री.ज्ञानेश्वर भानुदास सुपेकर |
| २. | श्री.बाबासाहेब भानुदास सुपेकर | ७. | श्री.आण्णासाहेब भानुदास सुपेकर |
| ३. | श्री.त्रिंबक भानुदास सुपेकर | ८. | श्रीमती मंदा शिवाजी सुपेकर |
| ४. | श्री.शिवाजी भानुदास सुपेकर | ९. | श्रीमती शारदा तानाजी सुपेकर |
| ५. | सौ.मंदा रामदास दिघे | | |

तरी वरील नमूद व्यक्तींना सूचित करणेत येते की, आपण दिनांक ११/०७/२०२५ रोजी स.११.३० वाजता उपनिबंधक, सहकारी संस्था, संगमनेर यशवंतराव चव्हाण प्रशासकीय इमारत, तिसरा मजला, नवीननगर रोड, संगमनेर, ता.संगमनेर, जि.अहिल्यानगर या कार्यालयात सुनावणीकामी हजर रहावे. सदर दिवशी व वेळी आपण अथवा आपल्यामार्फत प्राधिकृत इसम हजर न राहिल्यास अथवा लेखी म्हणणे सादर न केल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाच्या सुनावणीचे कामकाज पूर्ण करणेत येईल व पुढील योग्य तो निर्णय केला जाईल याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण-संगमनेर

दिनांक-२७/०६/२०२५

( संतोष कोरे)

उपनिबंधक

सहकारी संस्था, संगमनेर

# कोल्हारमधील व्यवसाय रात्री दहापर्यंत सुरु राहणार

## लेखी स्वरुपात दोन्ही ग्रामपंचायतच्या वतीने निवेदन देणार : सुरेंद्र पाटील खर्डे

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोल्हार :** दि. २ जुलै रोजी स्व. माधवराव खर्डे पाटील चौकात टपरी गाळेधारक, व्यापारी संघटना व व्यापारी असोसिएशनची संयुक्त मीटिंग पार पडली. प्रामुख्याने दोन महत्वाच्या मुद्द्यांवर लक्ष वेधून घेण्यासाठी सदर मीटिंग होणार असल्याचे टपरी गाळेधारक व्यापारी संघटणेचे अध्यक्ष शिवकुमार जंगम यांनी आधीच जाहीर केले होते. त्यात प्रामुख्याने रात्री ९ नंतर व्यवहार चालू ठेवण्यासाठी वेळ वाढवून देणे व वारंवार खंडित होणारा विज पुरवठा सुरळीत होण्या संदर्भात चर्चा करण्यात आली.

पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन सुजय विखे पाटील यांच्याशी या संदर्भात माझे बोलणे झाले असून आजपासूनच रात्री १० पर्यंत व्यवसाय सुरू ठेवण्यासंदर्भाचा निर्णय झाला आहे. पोलीस प्रशासनाशी माझे फोनवर बोलणे झाले असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले व लवकरच त्यांना लेखी स्वरुपातही दोन्ही ग्रामपंचायतच्या वतीने निवेदन देणार आहे.

**– सुरेंद्र पाटील खर्डे, माजी सरपंच**

### ठरावांची अंमलबजावणी कधी होणार?

ग्रामसभेमध्ये झालेल्या ठरावांचे पुढे काय झाले. जे जे ठराव झाले. त्यांची अंमलबजावणी कधी होणार? असा नाराजीचा सूर ग्रामस्थांमधून चर्चेला येत आहे.



शिवकुमार जंगम म्हणाले की, पूर्वी रात्री अपरात्री होत असलेले गैरप्रकार थांबवण्यासाठी किमान २ महिने तरी रात्री ९ नंतर व्यवहार बंद करण्यासंदर्भात सर्वांनुमते निर्णय झाला होता. त्याला आता २ महिने झाले आहेत. याची आठवण करून देतानाच वरील नियम आता शिथिल करून रात्रीची वेळ ही १० पर्यंत करावी जेणेकरून कोल्हार येथील हॉटेल तसेच तत्सम व्यवसायांवर विपरीत परिणाम होणार नाही याची काळजी घेता येईल. तसेच महावितरण अधिकाऱ्यांना देखील दि. १० जुलै रोजी वीज सुरळीत करण्या संदर्भात व वीज बिले माफक येण्या संदर्भात निवेदन देण्याचे निश्चित करण्यात आल्याचे जाहीर केले. याप्रसंगी संजय शिंगवी, अनिल बांगरे, तुषार बोऱ्हाडे, कोषाध्यक्ष अनिल कांकरिया, हॉटेल व्यवसायिक सचिन शिरसाठ, योगेश कोळपकर बापूसाहेब कुंभकर्ण, आशुतोष बोरसे, विशाल शिंदे, बीएम स्वीट्सचे भानाराम चौधरी, सचिन देशमाने, संतोष जंगम, तौसीफ शेख, महेश घुले, सागर शेळके व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दरम्यान मीटिंग सुरू असतानाच शिवकुमार जंगम यांनी कोल्हार गावचे माजी सरपंच ॲड. सुरेंद्र पाटील खर्डे यांच्याशी फोनवरून संपर्क साधला असता त्यांनी फोन स्पीकर मोडवर ठेवून व्यापारी व व्यावसायिकांशी संपर्क साधला.

# बीएसएनएल नेटवर्क सेवा सुरळीत करा; ग्राहक पंचायतची मागणी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अकोले :** आदिवासी बहुल दुर्गम भागासह तालुक्यामध्ये बीएसएनएलची नेटवर्क सेवा सुरळीत करा, अशा मागणीचे निवेदन ग्राहक पंचायत अकोले शाखेच्या वतीने भारत संचार निगम बीएसएनएल उपमंडल अभियंता कुमार सुमित यांना दिले आहे

अकोले आदिवासी तालुक्यामध्ये बीएसएनएलचा वापर मोठ्या प्रमाणात असून न्यायालय, पोस्ट, तहसील कार्यालय, वन विभाग, बँका, सेतु, पंचायत समिती, आदिवासी शासकीय कार्यालय, इतर शासकीय कार्यालय व निमशासकीय कार्यालये यामध्ये दैनंदिन अनेक काम



काजासाठी नेटवर्क सेवा नेहमी बंद पडत राहत असल्याने नागरीकांना व ग्राहकांना वरील कार्यालयीन अधिकारी यांना सेवा मिळत नसल्याने मनस्ताप व मानसिक ताण येत आहे. तसेच आदिवासी भागात व तालुक्यात बऱ्याच गावा-गावामध्ये बीएसएनएलचे टॉवर उभारलेले आहे ते कार्यान्वित असूनही सेवा मिळत नाही. सेतु कार्यालय, बँका, वन विभाग, शाळा, कॉलेजमध्ये बीएसएनएलचे वाय-फाय नेटवर्क वापरले जाते.

निवेदनावर जिल्हा उपाध्यक्ष, मच्छिंद्र मंडलीक, तालुका अध्यक्ष दत्ता शेनकर, माधवराव तिटमे दत्तात्रय शेटे, भाऊसाहेब वाकचौरे, महेश नवले, राम रुद्रे, गंगाराम धिंदळे, मोहन मुंढे, आनंद घाणे, सुरेश गबाले, गणपत थिगळे आदिंचे नावे आहे.

# डॉ. पाऊलबुधेच्या उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** नगर सोलापूर रोड वरील नारायणडोह येथील डॉ. एन. जे. पाऊलबुधे पॉलिटेक्निकच्या विद्यार्थ्यांनी एम एसबीटीई उन्हाळी २०२५ च्या परीक्षेत चमकदार कामगिरी केली असुन उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम ठेवली आहे. विद्यार्थ्यांनी समर्पण आणि कठोर परिश्रमाचे फळ एम



एसबीटीई परीक्षांमध्ये मिळवले आहे.

ग्रामीण भागात तंत्रशिक्षणासाठी प्रसिद्ध असलेली डॉ. एन. जे. पाऊलबुधे पॉलिटेक्निक ही संस्था महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाच्या परीक्षेत विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी केल्याचे निकालाने स्पष्ट झाले आहे.

या निकालात पॉलिटेक्निकच्या विद्यार्थ्यांनी चांगले गुण मिळवले आहेत तर विद्यार्थ्यांनी प्रथम श्रेणीचे गुण मिळवले आहेत. विद्यार्थ्यांची उत्कृष्ट कामगिरी त्यांच्या कठोर परिश्रम, समर्पण आणि दर्जेदार शिक्षण देण्याच्या संस्थेच्या वचनबद्धतेचे प्रतीक आहे.

कॉलेज मधील संगणक शाखेचा विद्यार्थी ऋषिकेश पागीरे ९०.९ टक्के गुण मिळवून पहिला आला. तर मुलींमध्ये स्नेहल ठोंबरे संगणक शाखामधुन ८९.७ टक्के मिळवून पहिली आली.

संस्थेच्या व्यवस्थापनाने आणि प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांचे त्यांच्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल अभिनंदन करून त्यांच्या यशाबद्दल अभिमान आहे. एमएसबीटीई परीक्षेत आमचे विद्यार्थी उत्कृष्ट कामगिरी करत असल्याचे पाहून आम्हाला खूप आनंद झाला आहे.

**– प्राचार्य बाळासाहेब बोर्डे**

# अवैध वाळुची वाहतूक करणाऱ्यांवर कारवाई

## शनिशिंगणापूर पोलिसांची धडक कारवाई; २१ लाखांचा मुद्देमाल जप्त

**जनता आवाज वृत्तसेवा**

**सोनई :** दि. १ जुलै रोजी रात्री ११ वाजता शिंगणापूर पोलीस पेट्रोलिंग करीत असताना खरवंडी शिवारात विना नंबरचे डंपरच्या तपासणीत तीन ब्रास अवैध वाळू मिळून आली आहे. घटनास्थळावरून डंपर चालक पळून गेला होता डंपर चालक व मालकाला अटक करून शिंगणापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अहिल्यानगरचे पोलीस अधीक्षक सोमनाथ घाडगे यांनी सर्व पोलीस ठाण्यांना अवैध व्यवसायावर कडक कारवाई करण्याचे आदेश दिले असल्याने शिंगणापूर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक



आशिष शेळके यांनी परिसरात पेट्रोलिंग वाढवली आहे.

याबाबत शिंगणापूर पोलिसांकडून समजलेली माहिती अशी की, रात्रीची गस्त ड्युटीवरील पोसई कारखेले, चालक पो. कॉ. हे. पवार, पो. कॉ. ठुबे असे शनिशिंगणापुर पोलीस स्टेशन हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना पेट्रोलिंग दरम्यान खरवंडी शिवारात छत्रपती संभाजीनगर ते अहिल्यानगर हायवे रोडवर सीपीएफ कंपनीचे समोर कंपनीचे गेटपासुन सुमारे २०० मीटर अंतरावर रस्त्याचे कडेला दि. २ जुलै रोजी पहाटे ४.४५ वाजताचे सुमारास विनानंबरचे लाल रंगाची बॉडी असलेले डंपर वाहनाच्या तपासणीत वाळु मिळुन आली.

या सर्व घटनेची माहिती सपोनि आशिष शेळके यांना समजले असता ते व पोकाॅ सुपारे हे घटनास्थळी गेले त्यावेळी सदरचे तीन ब्रास वाळु असलेले डंपर पळुन गेलेल्या आरोपीचा मोबाईल ताब्यात घेतले व विनानंबरचे डंपरवरील अनोळखी चालक व चालकास पळवुन घेऊन जाणारा डंपर मालक यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

सदरची कारवाई ही पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधिक्षक, श्रीरामपुर वैभव कलुबमे, अपर पोलीस अधिक्षक अहिल्यानगर प्रशांत खैरे, उपविभागीय पोलीस अधिकारी शेवगाव सुनिल पाटील यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि आशिष शेळके यांनी केली आहे.

# झरेकाठी येथे कृषीदुतांकडून कृषीदिन साजरा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**झरेकाठी :** महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री आणि हरित क्रांतीचे शिल्पकार स्वर्गीय वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त ग्रामीण कृषि कार्य अनुभव अंतर्गत श्रमशक्ती कृषी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी झरेकाठी येथे कार्यक्रमाचे आयोजन करून तेथील माध्यमिक विद्यालय आणि जि. प. शाळा यांचा सहकार्याने गावामध्ये पर्यावरण जनजागृकता करून पर्यावरण रक्षणाचा संदेश दिला.



या उपक्रमांतर्गत कृषीदूत गणेश लबडे, कृष्णा लाहोटी, शिवा सोनवणे, पवन खातोडे, स्वप्नील शिंदे,पृथ्वीराज रसाळ, सुशांत नवले यांनी गावातील सार्वजनिक ठिकाणी वृक्षांची लागवड करत वृक्षारोपणाचा संदेश दिला.

या उपक्रमात ग्रामस्थ आणि सामाजिक कार्यकर्त्यांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला. कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. एल. हारदे आणि डॉ. गणेश साकोरे, प्रा. एन . पी.तायडे कार्यक्रम अधिकारी प्रा. बी. डी. तायडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

यावेळी प्रवरा माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रभाकर सांगळे, पुलाटे उपस्थित होते. माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी लावलेली झाडे दत्तक घेऊन त्यांची निगा राखण्याची जबाबदारी स्वीकारली आहे.

### हरित आणि स्वच्छ गाव या दिशेने वाटचाल

विद्यार्थ्यांनी घेतलेला उपक्रम झरेकाठी सारख्या ग्रामीण भागात पर्यावरण संवर्धनाची चळवळ उभी करण्यास मदत करेल. ग्रामस्थांनी विद्यार्थ्यांच्या उपक्रमाचे कौतुक करत पुढेही सहकार्य करण्याची ग्वाही दिली. कार्यक्रमाने सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण केली असून हरित आणि स्वच्छ गाव या दिशेने एक सकारात्मक पाऊल टाकले गेले आहे.

# काळोखेंना शाहू महाराज पुरस्कार प्रदान

## केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाठ यांची हजेरी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** नगर येथील सामाजिक कायकर्ते चंद्रकांत काळोखे यांना यंदाचा राज्यस्तरीय छत्रपती राजर्षी शाहू महाराज सामाजिक न्याय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

विवेक विचार मंचातर्फे भारतीय संविधानाला अपेक्षित सामाजिक न्याय, समताधिष्ठित बंधूभाव पूर्ण समाज निर्मितीसाठी काम करणाऱ्यास या पुरस्काराने दरवर्षी सन्मानित करण्यात येते. हा पुरस्कार नागपूर येथे एका सोहळ्यात प्रदान करण्यात आला. चंद्रकांत काळोखे हे मातंग एकता आंदोलन या राज्यव्यापी संघटनेचे उपाध्यक्ष आहेत.भावीज्ञानी ग्रामीण युवा कला क्रीडा संकुल कर्जत व भानुविश्व ज्ञानयोगी निकेतन संस्थांचे अध्यक्ष असून गौरवशाली मातंग इतिहास संवर्धन संघटन संस्थेचे संस्थापक आहेत.त्यांनी समाजकार्यास प्रारंभ राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या पुणतांबा शाखेतून केला.

पुढे अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या माध्यमातून मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे प्रश्न सोडविण्याचे कार्य केले. त्यांचे शिक्षण बीएससी, बीए, बीपीएड, एमपीएड झाले असून, शिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांनी ग्रामपंचायतीत सदस्य म्हणूनही काम केले. नंतर जिल्हा परिषदेत नोकरी मिळूनही त्यांनी सामाजिक समर्पणासाठी ती सोडली.

त्यांच्या समता, बंधुता, एकात्मता, सामाजिक न्याय मिळवून देणे अशा योगदानाची दखल घेऊन त्यांना सामाजिक न्याय या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. याबाबत विविध अनेकांनी अभिनंदन केले आहे.

### केंद्रीय मंत्र्यांसह मान्यवरांची हजेरी

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, राज्याचे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाठ, बार्टीचे संचालक सुनिल वारे, जेष्ठ साहित्यिक पद्मश्री नामदेव कांबळे, डॉ. माधवी खोडे-चवरे, डॉ. सुभाष कोंडावार उपस्थित होते.



# नवीन शैक्षणिक धोरण शिक्षकांसह पालकांनी स्विकारावे

## अरुण कुलकर्णी; केडगावच्या सरस्वती विद्यालयात पालक सभा उत्साहात

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** केडगाव येथील सरस्वती विद्यालयात सुरु असलेल्या शैक्षणिक वर्षाची पहिली पालक सभा उत्साहात पार पडली. या सभेत मुलांच्या सर्वांगीन विकासासाठी पालकांची भूमिका यावर मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी मोठ्या संख्येने पालक वर्ग उपस्थित होते. अरुण कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली पालक सभा घेण्यात आली.

ॲड. प्रज्ञाताई असनीकर यांनी प्राथमिकच्या विद्यार्थ्यांना पालकांनी हसत-खेळत शिक्षण कसे द्यावे. विद्यार्थ्यांसाठी घरामध्ये आनंददायी वातावरणात कसे वाढवावे?, मुलांचा आहार, विद्यार्थ्यांचा शारीरिक, मानसिक, भावनिक विकास कसा करावा? याविषयी पालकांना मार्गदर्शन केले.

प्रास्ताविकात मुख्याध्यापक संदीप भोर यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीन विकासासाठी



राबविण्यात येत असलेले उपक्रमाची माहिती देऊन विविध स्पर्धा परीक्षा, स्कॉलरशिप परीक्षेत विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या गुणवत्तेचा आढावा घेतला.

यावेळी प्राध्यापक शेळके, माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका मोहिनी धमधिकारी, सर्व शालेय शिक्षक, पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. स्मिता खिलारी यांनी सूत्रसंचालन केले. अविनाश साठे यांनी आभार मानले.

सध्या शैक्षणिक धोरण झपाट्याने बदलत आहे. त्याचा स्विकार करुन पुढे जावे लागणार आहे. सर्वसामान्य वर्गातील मुलांना घडविण्याचे कार्य सरस्वती विद्यालयाच्या माध्यमातून होत आहे. शिक्षणाने प्रत्येकात एक आत्मविश्वास निर्माण होतो. कोणत्याही क्षेत्रात पुढे जाण्यासाठी शिक्षण ही यशाची पहिली पायरी ठरणार असल्याचे सांगून उच्च शिक्षण घ्यावे.

**– अरुण कुलकर्णी**

# संगमनेर तालुका काँग्रेसचे अध्यक्षपदी अजय फटांगरे

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर :** काँग्रेसच्या राष्ट्रीय वर्किंग कमिटीचे सदस्य तथा मा. प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली संगमनेर तालुका हा कायम काँग्रेसच्या विचारांचा बालेकिल्ला राहिला आहे. नव्याने तालुका काँग्रेसच्या अध्यक्षपदी जिल्हा परिषदेचे माजी सभापती अजय नारायण फटांगरे यांची तालुकाध्यक्ष पदी निवड करण्यात आली आहे. तर कोपरगाव ग्रामीणच्या तालुकाध्यक्षपदी नितीन राव मनोहर शिंदे यांची आणि भिंगारच्या तालुकाध्यक्षपदी रिजवान शेख यांची निवड करण्यात आली आहे.

माजी मंत्री बाळासाहेब थोरात व आ. सत्यजित तांबे यांच्या नेतृत्वाखाली अजय फटांगरे यांनी संगमनेर तालुका युवक काँग्रेसचे अध्यक्षपद सांभाळताना तालुक्यात युवकांचे मोठे संघटन उभे केले होते. याचबरोबर गोटा गटातून जिल्हा परिषदेचे उमेदवार म्हणून विक्रमी मताधिक्याने विजयी झाल्यानंतर माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली कृषी व पशुसंवर्धन विभागाचे सभापतीपद त्यांनी सांभाळले.

बोटा गटामध्ये गावोगावी सातत्याने विविध विकासाच्या योजना राबवल्या. तालुक्यातही त्यांचा जनसंपर्क कायम चांगला राहिला. त्यांच्या कामाची दखल घेऊन त्यांची संगमनेर तालुका काँग्रेसच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे.



या निवडीचे पत्र महाराष्ट्राचे प्रांताध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या अध्यक्षतेखाली २६ जून २०२५ रोजी झालेल्या काँग्रेस कमिटीच्या बैठकीत त्यांना देण्यात आले. त्यांच्या समवेतच कोपरगाव ग्रामीणच्या तालुकाध्यक्षपदी नितीन मनोहर शिंदे यांची तर भिंगारच्या अध्यक्षपदी रिजवान शेख यांची निवड करण्यात आली आहे.

त्यांच्या निवडीचे माजी मंत्री बाळासाहेब थोरात, प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, मा. आ. डॉ. सुधीर तांबे, आ. सत्यजित तांबे, जिल्हाध्यक्ष जयंत वाघ, दुर्गाताई तांबे, डॉ. जयश्रीताई थोरात, बाजीराव खेमनर, ॲड. माधवराव कानवडे, रणजितसिंह देशमुख, इंद्रजीत थोरात, संपतराव डोंगरे, सुधाकर जोशी, शंकरराव खेमनर यांनी अभिनंदन केले आहे.

### काँग्रेसचा विचार तरुणांमध्ये पोहचविणार : फटांगरे

माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी आपल्यावर कायम विश्वास ठेवला असून मोठी संधी दिली आहे. आपण अत्यंत प्रामाणिकपणे ही जबाबदारी पार पडणार असून काँग्रेस हा राज्यघटना व देशहिताचा विचार आहे. युवक या विचारापासून काही दुरावले असून त्यांना पुन्हा मुख्य प्रवाहात आणून काँग्रेसला अधिक बळकट करण्यासाठी यापुढील काळामध्ये माजी मंत्री थोरात यांच्या नेतृत्वाखाली अधिक सक्रियतेने जोमाने काम करून तालुक्यात व जिल्ह्यात पुन्हा काँग्रेस पक्ष प्रथम क्रमांकावर असल्याची भावना नवनियुक्त अध्यक्ष अजय फटांगरे यांनी व्यक्त केली आहे.

# बंच केबल टाका, अन्यथा आंदोलन : बाफना

**जनता आवाज वृत्तसेवा**

**जामखेड :** शहराचा विस्तार वाढत चालला असल्याचे अनेक ठिकाणी महावितरण कंपनीची विद्युत वाहिनी देखील सर्वत्र पसरली आहे. आनेक ठिकाणी या तारा उघड्या असल्याने या तारांना चिकटून जामखेड शहरातील व तालुक्यातील निष्पाप लोकांचा बळी गेला आहे. त्यामुळे तालुक्यासह शहरातील सर्व उघड्या विद्युत तारा बदलुन त्या ठिकाणी बंच केबल टाकण्यात याव्यात अन्यथा लवकरच महावितरण कार्यालयासमोर आंदोलन छेडण्याचा इशारा आदर्श फाउंडेशनचे अध्यक्ष व सामाजिक कार्यकर्ते आकाश बाफना यांनी निवेदनाद्वारे दिला आहे.

आकाश बाफना यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, जामखेड शहरामध्ये आपल्या महावितरणाच्या अनेक ठिकाणी विद्युत वाहिनी शहरांमध्ये सर्वत्र पसरलेली आहेत. अनेक वर्षापासून जाम खेड शहरातील स्टेशन हे लोक वस्तीमध्ये असल्यामुळे त्या ठिकाणा वरून बऱ्याच ठिकाणी विद्युत वाहिन्या पसरलेल्या आहेत व सदरील सबस्टेशनच्या दोन किलोमीटर अंतरावर सर्वच ठिकाणी ह्या वाहिन्या पूर्णपणे ओपन आहेत.

# घराचे कुलूप तोडून पाच लाखांचा मुद्देमाल लंपास



**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर :** साडूच्या तेराव्याला गेलेल्या कुटूंबाच्या बंद घराचे कुलूप तोडून घरातील सुमारे ५ लाख रुपयांचे दागिणे तसेच रोख रक्कम चोरून नेल्याची घटना शहरातील मोरगेवस्ती परिसरात जनता हायस्कूलजवळ घडली.

याप्रकरणी संजय बापूराव मुखेडकर यांनी शहर पोलिसांत फिर्याद दिली आहे. मुखेडकर यांचा घरगुती मेसचा व्यवसाय आहे. पुणे येथे त्यांच्या साडूचे निधन झाल्याने त्यांच्या तेराव्याच्या विधीसाठी मुखेडकर हे मुली आणि जावई यांच्याबरोबर रेल्वेने पुण्याला गेले होते. तेराव्याचा विधी करून ३० जूनला मुखेडकर हे पुन्हा श्रीरामपूरला आले व रात्री ९.३० वाजता कुलूप उघडायला गेले असता कुलूप खाली पडलेले दिसले. त्यांनी घरात पाहीले असता घराचा दरवाजा उघडा होता.

घरातील सामान अस्ताव्यस्थ पडलेले होते. हॉलमधील छोटे कपाटही उघडलेले दिसले. तसेच आतील रूममधील दोन लोखंडी कपाटही उघडे दिसले. त्यांनी ठेवलेले दागिणे, रोख रक्कम पाहीली असता चोरट्यांनी सुमारे ४ लाख ९३ हजार ४०० रुपयाचा मुद्देमाल चोरल्याचे आढळून आले.

याप्रकरणी अज्ञात चोरट्यांविरूद्ध श्रीरामपूर शहर पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास श्रीरामपूर शहर पोलीस करीत आहेत.

# खर्डा गावामध्ये लम्पी रोगाचा शिरकाव

## पशुपालकांमध्ये भितीचे वातावरण; उपाययोजना करण्याची मागणी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**जामखेड :** तालुक्यातील खर्डा येथे काही शेतकऱ्यांच्या जनावरांमध्ये लम्पीचे लक्षण आढळल्याने पशुपालकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे.

खर्डा येथील पशुपालक सुरेश ढेरे यांच्या गाईला मागील तीन दिवसांपासून अंगावर मोठे फोड आले, पायाला सूज देखील आहे. सुरेश ढेरे यांनी सरकारी डॉक्टर उपलब्ध नसल्यामुळे खाजगी डॉक्टरकडून उपचार करून घेण्याची वेळ आली. यामुळे त्यांना आर्थिक भुर्दंड सहन करण्याची वेळ आली.



सध्या संसर्गजन्य लम्पी आजाराचा प्रादुर्भाव वाढू लागल्याने पशुपालन करणाऱ्या शेतकऱ्यांमध्ये घबराटीचे वातावरण पसरले. अवर्षण प्रवण दुष्काळी तालुका म्हणून ओळखला जाणाऱ्या तालुक्यात लम्पी आजाराचा प्रादुर्भाव आढळल्यामुळे पशुधन वाचवण्यासाठी धावपळ करताना दिसून आला. शेतीला पूरक धंदा म्हणून दुध व्यवसाय मोठ्या प्रमाणात शेतकरी करताना दिसून येतो. त्यातच पशुपालकांना लम्पी आजाराचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी शासकीय कर्मचारी उपलब्ध नसल्याने शेतकऱ्याला आर्थिक नुकसानीचा सामना करावा लागत आहे.

तालुक्यातील जामखेड, खर्डा व नान्नज या ठिकाणी तीन पशुधन वैद्यकीय अधिकारी अपेक्षित असताना दोन पशुधन वैद्यकीय अधिकाऱ्यावर अतिरिक्त कारभारावर वैद्यकीय सेवा चालू आहे. त्यातच तालुक्यात सात पशुवैद्यकीय दवाखाने असून यापैकी जातेगाव येथील पशुधन पर्यवेक्षक हे पद रिक्त आहे. यामुळे सध्या जामखेड तालुक्यातील पशु सेवा ही अतिरिक्त कारभार म्हणजेच रामभरोसे चालू असल्याचे दिसून येते.

सरकारी दवाखान्यात गेलो असता तेथे डॉक्टर उपलब्ध नसल्याने खाजगी डॉक्टरकडून उपचार करण्याची वेळ आली. शासकीय माणूस नसल्याने तक्रार कोणाकडे करायची.

**-सुरेश ढेरे , पशुपालक, खर्डा**

कर्मचारी रिक्त पदे असल्याने लसीकरण करण्यास अडचण येते, खाजगी पशु वैद्यकीय सेवा करणारा डॉक्टरची लसीकरण करण्यास मदत घ्यावी लागते. पशुपालकांची निरोगी जनावरांची लसीकरण करण्यासाठी उदासीनता दिसून येते, तालुक्यात लसीकरण मोहीम चालू आहे.

**-डॉ. बाळकृष्ण कांबळे, अतिरिक्त पशुधन विकास अधिकारी, जामखेड**

# देवसडे येथे कृषि दिन साजरा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कुकाणा :** देवसडे (ता. नेवासा) येथे मुळा एज्युकेशन सोसायटीच्या कृषि महाविद्यालय सोनईच्या कृषिदूतांनी ग्रामीण कृषि कार्यानुभव अंतर्गत 'कृषि दिन' उत्साहात साजरा करण्यात आला.



या निमित्ताने कृषिदूतांनी शेतकऱ्यांना फळबाग विकास, जलसंधारण, सेंद्रिय शेती, आधुनिक तंत्रज्ञान, पीकविमा, शेततळे अनुदान, प्रधानमंत्री कृषी सिंचाई योजना, फळबाग लागवड अनुदान योजना आदी विविध सरकारी योजनांची माहिती दिली. कृषि क्षेत्रातील नव्या संधी व योजनांचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन करण्यात आले. जि. प. प्राथमिक शाळेतील चिमकल्यांच्या सहभागातून वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी पर्यावरण संरक्षणाचे व शाश्वत शेतीचे महत्त्व पटवून देण्यात आले. त्याक्षणी मुख्याध्यापक हनुमान नजन व शिक्षिका भोगे यांचेसह विद्यार्थी उपस्थित होते.

या उपक्रमासाठी कृषिदूत अनमोल गरड, वरद खरात, ओम देवगांवकर, गौरव गांजे, अजय बहिराम आणि साहिल खोब्रागडे यांनी सहभाग घेतला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्राचार्य डॉ. हरी मोरे, उपप्राचार्य प्रा. सुनील बोरुडे, समन्वयक डॉ. अतुल दरंदले आणि कार्यक्रम अधिकारी डॉ. संतोष चौगुले यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

# छळाला कंटाळून तरूणाची आत्महत्या

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** मानसिक छळ करून तरूणाला आत्महत्येस प्रवृत्त केल्याच्या आरोपावरून चौघांविरूध्द एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी लालसिंह छोगसिंह शेखावत (वय ४४ रा. आदर्शनगर, राम मंदिराजवळ, नागापुर, एमआयडीसी) यांनी फिर्याद दिली आहे.जितेंद्रसिंह सुरेंद्रसिंह राठोड (रा. आदर्शनगर, राम मंदिराजवळ, नागापूर) असे आत्महत्या केलेल्या तरूणाचे नाव आहे.डिंपल राठोड, प्रियंका उर्फ सिंपल राठोड, डिंपल हिचे वडील ओनाडसिंह जयपालसिंह शेखावत (सर्व रा. गांधीनगर, जयपूर, राजस्थान) व गजेंद्रसिंह राठोड (रा. विस्तार जनपथ, जयपूर, राजस्थान) अशी गुन्हा दाखल झालेल्या संशयित आरोपींची नावे आहेत. संशयित आरोपींनी जितेंद्रसिंह राठोड यांचा सन २०१६ ते १६ जून २०२५ रोजी सकाळी ११ वाजताच्या दरम्यान मानसिक छळ केल्याने त्या सर्वांच्या मानसिक छळाला कंटाळून त्याने घराच्या टेरेसवरील इलेक्ट्रीक तारेला हात लावुन आत्महत्या केली.

# गोवर्धन परांडेंची तैवान येथे पीएचडीसाठी निवड

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर :** पारनेर महाविद्यालयाच्या रसायनशास्त्र विभागाचा विद्यार्थी गोवर्धन परांडे यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर अभिमानास्पद यश मिळवत तैवानमधील नामांकित राष्ट्रीय यांग मिंग चिओ तुंग विद्यापीठात पीएच. डी. अभ्यासक्रमासाठी त्यांनी प्रवेश मिळवला आहे.



गोवर्धन १ सप्टेंबर २०२५ पासून कॉलेज ऑफ सायन्स या विद्याशाखेत संशोधन कार्यास प्रारंभ करणार आहे. या निवडीमुळे त्यांचा सर्व स्तरांतून सत्कार होत असून, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी हे यश प्रेरणादायी ठरत आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर गोवर्धन परांडे यांनी आपल्या कठोर परिश्रम आणि समर्पणाच्या जोरावर तैवानमधील प्रतिष्ठित शिक्षण संस्थेमध्ये प्रवेश मिळवला आहे. ही निवड केवळ त्यांच्यासाठीच नव्हे, तर संपूर्ण पारनेर तालुक्यासाठी गौरवाची बाब आहे. या यशामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय पा-तळीवर संशोधनाची संधी मिळू शकते, याचा प्रत्यय आला आहे.

नगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र दरे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रंगनाथ आहेर, उपप्राचार्य डॉ. तुकाराम थोपटे यांनी त्यांचे कौतुक केले आहे.

# चातुर्मासासाठी साध्वींचे आगमन होणार

**जनता आवाज वृत्तसेवा**



**श्रीरामपूर :** येथील शिवाजी रोडवरील जैन स्थानकात १० जुलै पासून प्रारंभ होणाऱ्या चातुर्मासासाठी जैन दिवाकर सांप्रदायाच्या साध्वी उपप्रवर्तीनी डॉ. सत्यसाधनाजी व त्यांच्या सात शिष्या शहरातील सरस्वती कॉलनी, वॉर्ड नं. ७ मधील संजय छाजेड यांच्या निवासस्थानापासून ४ जुलै रोजी विहार करून शहरात शोभा यात्रेनंतर जैन स्थानकमध्ये त्यांचा प्रवेश व आगमन होणार आहे.साध्वीजी सम्यकदर्शनाजी यांच्या समवेत त्यांच्या शिष्या पू. अर्हतज्योतीजी, पू. तन्मयदर्शनाजी, पू. हितसाधनाजी, पू. हर्षप्रज्ञाजी, पू. गुरूछायाजी, पू. सौम्यज्योतीजी या साध्वींचा समावेश आहे.छाजेड यांच्या निवासस्थानापासून निघणाऱ्या शोभा यात्रेत सकल जैन समाजाने सहभागी व्हावे. स्थानकमध्ये प्रवेशानंतर होणाऱ्या प्रवचनाचा व दर्शनाचा लाभ घ्यावा. प्रवचनानंतर श्रावक संघाने आयोजित केलेल्या गौतम प्रसादीचा भाविकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन श्री स्थानकवासी जैन संघाचे विश्वस्त मंडळ व अध्यक्ष रमेश लोढा यांनी केले आहे.

# एक रुपयात पीक विमा योजना सुरु करा

## पोटफोडे; गोळेगाव येथे नूतन शाखेचे उद्‌घाटन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**शेवगाव :** एक रुपयात पीक विमा योजना शासनाने पुन्हा सुरु करावी, फक्त निवडणुकीपुरत्याच शेतकरी योजना आणू नये, त्या कायमस्वरूपी सुरु ठेवाव्यात, असे प्रतिपादन जनशक्तीचे कार्याध्यक्ष रामजी पोटफोडे यांनी केले.



गोळेगाव येथे जनशक्ती विकास आघाडीच्या नूतन शाखेचे बुधवारी (दि.२) उद्घाटन झाले. यावेळी नवनाथ फुंदे यांची अध्यक्ष म्हणून बाळासाहेब बर्डे उपाध्यक्ष, नवनाथ बर्डे सचिव, तर नवनाथ रासनकर यांची कार्याध्यक्ष म्हणून यावेळी जनशक्तीचे कार्याध्यक्ष राम पोटफोडे यांच्या उपस्थितीत निवडी करण्यात आल्या. तर बाबासाहेब बर्डे, शिवाजी रासनकर, भुजंग फुंदे, सोमनाथ रासनकर, अशोक बर्डे, रामा बर्डे, अशोक काशीद, भारत मंचरे, संदीप बर्डे, ज्ञानेश्वर बर्डे आदींची सदस्य पदी निवड करण्यात आली.


रामजी पोटफोडे म्हणाले, निवडणुका जवळ आल्या की, शासन विविध योजनांचा पाऊस पाडते व निवडून आले की योजना बंद करून टाकते. १ रुपयात पिक विमा योजना सरकार बंद करू पाहत आहे. १ रुपयात विमा असल्यामुळे गोरगरीब शेतकरी देखील विमा उतरवू शकतात. परंतु आता ही योजनाच बंद झाली असल्याने गोर-गरीब शेतकऱ्यांजवळ विमा रक्कम भरण्याइतपत पैसे नसल्याने ते विमा भरू शकत नाहीत. तसेच शेतकऱ्यांना कर्जमाफी लवकरात लवकर करावी.

पिकवलेल्या मालाला कवडीमोल भाव मिळत असल्याने महाराष्ट्रातील शेतकरी आज मोडत चाललेला आहे. कारखान्यांना दिलेल्या उसाचे पेमेंटही अजून शेतकऱ्यांना मिळालेले नाही. काही ऊस तोडणी मजुरांनाही त्यांची मजुरी मिळालेली नाही, असेही राम पोटफोडे म्हणाले. सूत्रसंचालन मंजाराम रासनकर यांनी केले. आभार नवनाथ बर्डे यांनी मानले.

# डॉ. नामदेव महाराज शास्त्री लिखित ई-बुकचे लोकार्पण

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी :** श्री क्षेत्र भगवानगडाचे मठाधिपती, न्यायाचार्य डॉ. नामदेव महाराज शास्त्री बाबा यांनी वारकरी सांप्रदायाला दिशादर्शक असणारे संपूर्ण ज्ञानेश्वरी ग्रंथ भावानुवाद लिखाणाचे महत्वपूर्ण काम हाती घेतलेले आहे. त्यापैकी तिसऱ्या अध्यायाच्या भावानुवाद ई-बुक ग्रंथाचे मंगळवारी (दि.१) श्री क्षेत्र भगवानगड येथून लोकार्पण झाले आहे.





डॉ. श्री. नामदेव महाराज शास्त्री पारंपरिक वारकरी संप्रदायातील प्रवचनकार व कीर्तनकार असून त्यांचे सुरुवातीचे शिक्षण आळंदीतील वारकरी शिक्षण संस्थेत झाले. त्यानंतर संस्कृत साहित्यात सर्वात कठीण असणाऱ्या न्यायशास्त्राचं शिक्षण श्रीगुरू श्री १००८ स्वामी काशिकानन्दगिरीजी महाराज द्वादशदर्शनाचार्य आनंदवन आश्रम कांदिवली, मुंबई येथे गुरुकुल पद्धतीने ९ वर्षे शिक्षण घेऊन वाराणशी विद्यापिठाची न्यायाचार्य ही पदवी संपादन कली. तसेच पुणे विद्यापीठातुन एम. ए. (मराठी) करून 'वारकरी संतांची कुटरचना' या विषयावर मराठवाडा विद्यापीठातून पीएचडी मिळवली.

श्री क्षेत्र भगवानगडाचे द्वितीय उत्तराधिकारी वै. गुरुवर्य श्री संत भीमसिंह महाराजांच्या वैकुंठगमनानंतर १० नोव्हेंबर २००३ पासून श्री क्षेत्र भगवानगडाच्या गादीचे उत्तराधिकारी म्हणून ते भगवानगडाची जबाबदारी सांभाळत आहेत. त्यांचे ज्ञानेश्वरी व संस्कृतचे अध्ययन अध्यापन चालू आहे. पारंपरिक व आधुनिक दोन्ही अभ्यास असणारे असे हे वक्ते आहेत.

# बंदिस्त शेळीपालन प्रशिक्षणाचे प्रवेश आयोजन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**लोणी :** प्रवरा इन्स्टिट्यूट ऑफ रिसर्च अँड एज्युकेशन इन नॅचरल अँड सोशल सायन्स (पायरेन्स) संस्थेअंतर्गत असणाऱ्या कृषी विज्ञान केंद्र, बाभळेश्वर येथे बंदिस्त शेळीपालन या प्रशिक्षणासाठी प्रवेश सुरू असल्याची माहिती केंद्राचे प्रमुख शास्त्रज्ञ शैलेश देशमुख यांनी दिली आहे.



सदर प्रशिक्षणातून ग्रामीण युवक व युवतींना शेळीपालन विषयी व्यावसायिक मार्गदर्शन मिळणार असून या माध्यमातून स्वयंरोजगार निर्मिती या उद्देशाने संस्थेचे अध्यक्ष तथा जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या संकल्पनेतून संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुप्रिया ढोकणे पाटील, कृषी विज्ञान केंद्राचे संचालक डॉ. उत्तमराव कदम, पायरेन्स संस्थेचे सचिव डॉ. निलेश बनकर यांच्या मार्गदर्शनाखाली कृषि विज्ञान केंद्रात होत असलेल्या प्रशिक्षणामध्ये शेळ्यांच्या जाती, शेळ्यांचे रोग व आजार व्यवस्थापन, व्यावसायिक दृष्ट्या मटणासाठी शेळीपालन, प्रकल्प आराखडा तयार करणे, मार्केटिंग शेड उभारणी, बँकिंगच्या विविध योजना यांसारख्या विषयावर तज्ञ मार्गदर्शन करणार आहेत.

# देवसड़े येथे कृषि दिन उत्साहात साजरा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कुकाणा :** देवसडे (ता. नेवासा) येथेमूळा एज्युकेशन सोसायटीच्या कृषि महाविद्यालय सोनई च्या कृषिदूतांनी ग्रामीण कृषि कार्यानुभव अंतर्गत 'कृषि दिन' उत्साहात साजरा करण्यात आला.या निमित्ताने कृषिदूतांनी शेतकऱ्यांना फळबाग विकास, जलसंधारण, सेंद्रिय शेती, आधुनिक तंत्रज्ञान, पीकविमा, शेततळे अनुदान, प्रधानमंत्री कृषी सिंचाई योजना, फळबाग लागवड अनुदान योजना आदी विविध सरकारी योजनांची माहिती दिली. कृषि क्षेत्रातील नव्या संधी व योजनांचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांनी पुढाकार घ्यावा असे आवाहन करण्यात आले. जि. प. प्राथमिक शाळेतील चिमुकल्यांच्या सहभागातून वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी पर्यावरण संरक्षणाचे व शाश्वत शेतीचे महत्त्व पटवून देण्यात आले. त्याक्षणी मुख्याध्यापक हनुमान नजन व शिक्षिका भोगे यांच सह विद्यार्थी उपस्थित होते.या उपक्रमासाठी कृषिदूत अनमोल गरड, वरद खरात, ओम देवगांवकर, गौरव गांजे, अजय बहिराम आणि साहिल खोब्रागड़े यांनी सहभाग घेतला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्राचार्य डॉ. हरी मोरे, उपप्राचार्य प्रा. सुनील बोरुडे, समन्वयक डॉ. अतुल दरंदले आणि कार्यक्रम अधिकारी डॉ. संतोष चौगुले यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.


# सुगंधी तंबाखू व मावा बनवणारा कारखाना उद्‌ध्वस्त

## २.२९ लाखांचा मुद्देमाल जप्त; चार जणांवर गुन्हा दाखल

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** सुगंधी तंबाखू व माव्याच्या उत्पादनावर पोलिसांनी मोठी कारवाई करत सावेडी उपनगरातील नामदेव चौक परिसरात सुरू असलेला अवैध कारखाना उध्दवस्त केला. विशेष पोलीस पथकाने केलेल्या कारवाईत एकूण २ लाख २९ हजार ९१० रूपयांचा मुद्देमाल जप्त करत चार जणांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या आदेशानुसार जिल्ह्यात अवैध धंद्यांविरूध्द विशेष मोहीम हाती घेण्यात आली असून, त्याअंतर्गत ही कारवाई करण्यात आली. परिविक्षाधीन पोलीस उपअधीक्षक संतोष खाडे यांच्या नेतृत्वाखाली हे विशेष पथक गस्त करत असताना, संदेश नगर, नामदेव चौक येथील गोरक्षनाथ शंव शंकर मुर्तडकर याच्या नवनाथ निवास या इमारतीच्या टेरेसवर छापा टाकण्यात आला. या ठिकाणी बंदी असलेली सुगंधी तंबाखू व मावा बनवण्यासाठी लागणाऱ्या साहित्यासह उत्पादन सुरू असल्याचे निष्पन्न झाले. गोरक्षनाथ शंकर मुर्तडकर (वय ४८, रा. संदेशनगर, अहिल्यानगर), शुभम रावसाहेब गुंजाळ (वय २१, रा. सहकारनगर, मूळ रा. वांबोरी, राहुरी), गणेश बापू डोईफोडे




(वय २९, रा. वडगाव गुप्ता), विक्री राजू खैरे (वय ४०, रा. तुलसी पार्क, जाधव मळा) यांच्याविरूध्द तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गोरक्षनाथ मुर्तडकर याच्याकडेच माव्याचा व्यवसाय असल्याची कबुली मिळाली असून, उर्वरित तिघे रोजंदारीवर काम करत असल्याचे निष्पन्न झाले आहे.

### हे साहित्य केले जप्त

मावा तयार करण्याचे २ इलेक्ट्रिक मशिन्स, वजन काटा, मावा तयार करण्याचे साहित्य, सुगंधी तंबाखू व तयार मावा असा मुद्देमाल जप्त केला आहे. सदरची कारवाई परिविक्षाधीन पोलीस उपअधीक्षक खाडे, उपनिरीक्षक राजेंद्र वाघ, अंमलदार दिगंबर कारखिले, मल्लिकार्जुन बनकर, उमेश खेडकर आदींच्या पथकाने केली.




# किसान पुत्राची कमाल!

शेतकऱ्यांच्या आत्महत्या हा मुद्दा दिवसेंदिवस गंभीर होत चालला आहे. शेतकरी कुटुंबातील कर्ता पुरुष किंवा स्त्रिया शेतीच्या समस्यांना कंटाळून आत्महत्या करत आहेत. शेतमालाला योग्य दर मिळत नाही. त्यामुळे उत्पादनात वाढ होत नाही. परिणामी, कर्ज काढण्याशिवाय पर्याय उरत नाही. हीच बाब लक्षात घेऊन यवतमाळ तालुक्यातील पंकज महल्ले आणि त्याची पत्नी श्वेता ठाकरे यांनी शेतमालाच्या खरेदी-विक्री व्यवहाराचे पारदर्शी मॉडेल तयार करण्याचा निर्णय घेतला. त्यातूनच 'ग्रामहित' ही कंपनी स्थापन झाली. पंकज यांनी यवतमाळ येथील सावित्री ज्योतीराव समाजकार्य महाविद्यालयातून पदवी घेतल्यानंतर टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस (टीस) मुंबई येथून पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर टाटा सीएसआर प्रकल्पांतर्गत जमशेदपूर येथे टाटा स्टीलमध्ये उच्च पदावर काम केले. बड्या पगाराची नोकरी असल्याने आयुष्य सुकर होते. पण यवतमाळातील शेतकऱ्यांच्या व्यथा त्यांना स्वस्थ बसू देत नव्हत्या. त्यामुळे नोकरी सोडून पत्नीबरोबर ते गावाकडे आले आणि शेतकऱ्यांच्या हिताचा प्रवास सुरू झाला. त्यांनी शेतमाल साठवून विक्री करण्याची शास्त्रोक्त आणि आधुनिक पद्धत शेतकऱ्यांना समजावून दिली.

त्यांनी हवाबंद कंटेनरमध्ये धान्य साठवणुकीची वैज्ञानिक पद्धत अंगिकारली. दरवाढीची खात्री पटल्यावरच शेतकऱ्यांचे धान्य अत्याधुनिक कोठाराबाहेर काढले जाते. धान्यसाठ्यावर कर्जपुरवठाही होतो. धान्य टिकविण्यासाठी रासायनिक फवारणी त्यांना मान्य नाही. धान्याच्या दर्जावर ॲपद्वारे पाळत ठेवली जाते. त्यातून हजारो लोकांची मिळकत वाढली आहे. शेतमालाच्या विक्रीमधील शेतकऱ्यांचे शोषण थांबवून बाजार व्यवस्था सुलभ करणाऱ्यासाठी 'ग्रामहित' काम करते. ही सुविधा मोबाईल क्लिकवरून दिली जाते. यामुळे शेतकऱ्याला वारंवार बाजारपेठेत जाण्याची गरजही पडत नाही. यापूर्वी 'ग्रामहित'ची अमेरिकेतील 'सिस्को ग्लोबल प्रॉब्लेम सॉल्वर चॅलेंज-२०२१'साठी निवड झाली होती. तसेच आशिया खंडातील नामांकित अग्रगण्य सामाजिक उद्योजकता क्रमवारीत

अचिव्हर

त्यांच्या 'ग्रामहीत' कंपनीला प्रमुख १०० कंपन्यांमध्ये जागा मिळाली होती.

पीक घेण्यासाठी शेतकरी विविध ठिकाणावरून कर्ज घेतात. त्या पैशातून शेतात पीक उभे करतात. पिककाढणीचा हंगाम आल्यानंतर देणी फेडण्यासाठी शेतकरी एकाच वेळी आपला शेतमाल विक्रीला आणतात. एकाचवेळी मोठ्या प्रमाणात माल उपलब्ध झाल्यामुळे व्यापारी वर्गाकडून शेतमालाचा दर पाडला जातो. तेव्हा आर्थिक अडचणीत असल्याने शेतकऱ्यांना भाव नसलेला माल विकावा लागतो. यातून त्यांची आर्थिक घुसमट होते. हे होऊ नये यासाठी 'ग्रामहित' ने मोलाचे पाऊल उचलले. 'ग्रामहित'च्या माध्यमातून शेतकरीपुरक बाजार व्यवस्था, सुलभ आणि विश्वसनीय करण्याचा प्रयत्न पंकज यांनी केला.



## शेर की जुबानी

हम अल्फाजो को ढुंढते रह गये
और वो आँखों से गजल कह गये।

यूँ तो काफी मिर्च मसाले हैं
इस जिंदगी में, तुम्हारे बिना जायका
फिर भी फीका ही लगता है।

वो किताबो में दर्ज था ही नहीं,
सिखाया जो सबक जिंदगी ने।

## स्मार्ट टिप्स

### फोनचे बॅक कव्हर धोक्याचे?



फोन घेतल्यावर सुरक्षेची चिंता असते. त्यामुळे लोक लगेचच आकर्षक फोन कव्हर शोधू लागतात. या कव्हरमुळे फोन फुटण्यापासून आणि स्क्रॅचपासून सुरक्षित राहतो. पण हे फोन कव्हर मोबाईलसाठी घातक ठरू शकतात. मोबाईलचं कव्हर जाड असल्याने हँगिंग आणि ओव्हरहीटिंगची समस्या होते. तुमचा फोन गरम झाल्यास त्याचा बॅटरीच्या क्षमतेवरही परिणाम होतो. कव्हर चांगल्या क्वालिटीचं नसल्यास त्यावर बॅक्टेरिया जमा होतात. ते तुम्हाला आणि फोनच्या सेन्सर्सलाही नुकसान पोहोचवू शकतात. फोनला कव्हर असलं की तुम्ही वेळोवळी ते साफ करू शकत नाही. त्यामुळे फोनच्या स्पीकरवर घाण साचू लागते आणि एक वेळ अशी येते की स्पीकर घाणीमुळे बंद होतो.

## स्मार्ट ट्रिक्स

### फ्लिपकार्ट सेल सुरू!




सध्या फ्लिपकार्टवर 'फ्लिपकार्ट बिग एंड ऑफ सिझन' सेल सुरू आहे. या सेलच्या दरम्यान स्मार्टफोन, गॅजेट आणि ॲक्सेसरीज व्यतिरिक्त फॅशनेबल उत्पादनांवर चांगले डिस्काउंट मिळत आहेत. जास्तीत जास्त ८० टक्क्यांपर्यंत डिस्काउंटचा फायदा ग्राहक घेऊ शकतात. स्मार्ट गॅझेट्स आणि ॲक्सेसरीजवर ५० ते ८० टक्क्यांपर्यंतची सूट मिळत आहे. त्याव्यतिरिक्त स्मार्टफोनवरदेखील ८० डिस्काउंट मिळत आहे. या सेल दरम्यान ग्राहकांना दहा टक्क्यांपर्यंत त्वरित डिस्काउंट मिळू शकतो. त्यासाठी फ्लिपकार्ट यूपीआयचा वापर करावा लागेल. मात्र, त्यासाठी काही नियम आणि अटी लागू असणार आहेत.

## बी अलर्ट

### मोबाईलचा स्फोट होऊ नये म्हणून...

मोबाईलचा स्फोट होऊन अनेक दुर्घटना होताना दिसतात. बॅटरी अधिक काळ चार्ज केल्यास किंवा मोबाईलमधल्या तांत्रिक गडबडीमुळे स्फोट होऊ शकतो. मोबाईलची निर्मिती करताना झालेल्या चुकांमध्ये तो लवकर गरम होतो. अशा परिस्थितीत बॅटरी अधिक चार्ज केल्यास स्फोट होऊ शकतो. तुमच्या मोबाईलची बॅटरी लवकर संपत असेल तसंच फोन खूप गरम होत असेल तर तो लगेच दुरुस्त करून घ्या. तसंच फोन अधिक काळ चार्ज करू नका. फोन किमान ९० टक्के चार्ज व्हायला हवा. तसंच बॅटरी पूर्ण संपेपर्यंत थांबू नका. बॅटरी १५ टक्के असताना चार्जिंगला लावा. शिवाय फोन चार्जिंगला लावून गादीवर किंवा लॅपटॉवर ठेऊ नका.



## ॲप वर्ल्ड

### तुमच्या आवाजात बोलणार एआय !



अनेकदा कामाच्या गडबडीत कॉलवर कोणाशी बोलता येत नाही. पण आता ट्रूकॉलर तुमची ही अडचण सहज सोडवणार आहे. कॉल आला तर कृत्रिम बुद्धीमत्तेच्या (एआय)मदतीने तुमच्या आवाजात समोरच्या व्यक्तीशी हे फीचर संवाद साधणार आहे. ग्राहक त्यांच्या एआय व्हर्झनमध्ये त्यांचा खरा आवाज जोडतील. त्यामुळे कॉल आल्यावर एआयच्या मदतीने हुबेहुब तुमच्या आवाजात हा व्हाईस असिस्टंट बोलेल. ट्रूकॉलर बोगस कॉल आणि स्पॅम कॉल यांची ओळख करण्यासाठीचे एक ॲप आहे. नवीन एआय व्हाईस असिस्टंट फीचरसाठी ट्रूकॉलरने Microsoft zure AI Speech सोबत हात मिळवला आहे.

# लक्षात ठेवा या गोष्टी!

आपल्या बोलण्याने लोकांनी प्रभावित व्हावे असे वाटणे चुकीचे नाही. परंतु, बोलणे प्रभावी नसेल तर लोक आपल्याशी बोलण्याचे टाळतात. त्यासाठी काही महत्त्वपूर्ण बाबी लक्षात घेणे गरजेचे आहे.

✻ मनमिळाऊ स्वभाव: आजकाल बरेच जण आपल्या विश्वामध्ये इतके मग्न असतात की ते क्वचितच बाहेरच्या लोकांना भेटतात. त्यामुळे तुम्ही भेट देत असलेल्या व्यक्तीशी मैत्रीच्या भावनेने बोला. बोलताना आवाज सौम्य ठेवा. तसेच पूर्ण स्वारस्याने बोला. यामुळे लोक तुम्हाला सहज लक्षात ठेवतील आणि पुन्हा भेटण्याचे स्वारस्य दाखवतील.

ग्रुमिंग

✻ प्रत्येक व्यक्तीला स्वतंत्रपणे भेटा: तुम्ही एरवी ग्रुपमध्ये भेटत असाल तरीही प्रत्येक व्यक्तीला स्वतंत्रपणे भेटा आणि बोला. यामुळे अधिक चांगला प्रभाव पडतो शिवाय लोक तुमची आठवण ठेवतात.



✻ वाद घालणे टाळा: तुम्ही एखाद्याला पहिल्यांदा भेटत असाल तर त्यांच्याशी वाद घालणे टाळा. असे केल्याने प्रभाव नकारात्मक ठरू शकतो. पहिल्या भेटीत कोणत्याही वादग्रस्त विषयावर बोलणे टाळा. तसेच एखाद्या गोष्टीवर एकमत नसले तरी असहमती व्यक्त करू नका.

✻ मदतीची भावना बाळगा: एखाद्याला भेटताना, त्याला/तिला मदतीचा हात नक्कीच पुढे करा. लोक उपयुक्त स्वभावाची व्यक्ती दीर्घकाळ लक्षात ठेवतात.

✻ ज्ञान महत्त्वाचे आहे: लोकांना तुमच्याकडे आकर्षित करण्यासाठी चांगले व्यक्तिमत्व आणि चांगले वर्तन असणे महत्त्वाचे आहे. शिवाय यश मिळविण्यासाठी ज्ञान असणे आवश्यक आहे. कोणाशी बोलत असताना तुमचे ज्ञान लोकांना प्रभावित करते आणि ते तुमच्याकडे आकर्षित होतात.

# इथे करा कॅम्पिंग


दोस्तांनो, पर्यटनाला निघताना सुरक्षेची विशेष काळजी घ्यायला हवी. कमी गर्दीच्या आणि ऑफबीट ठिकाणांचा शोध घ्यायला हवा. अनेक पर्यटकांना कॅम्पिंग करायला आवडतं. त्यातही मुलांचा ग्रुप फिरायला बाहेर पडला की मस्तपैकी तंबू ठोकून मुक्काम करता येतो. तुम्हीही भटकंती करण्याच्या विचारात असाल तर गोव्याला भेट देता येईल. गोव्यातली काही शांत, निवांत ठिकाणं तुम्हाला आकर्षित करतील.

✻ इथल्या तालपोना बीचवर तुम्ही निवांत भटकंती करू शकता. या बीचवर फार गर्दी नसल्यामुळे हे कॅम्पिंगचं सर्वोत्तम ठिकाण ठरू शकतं. इथे तुम्ही समुद्रात डुंबण्याचा आनंद लुटू शकता.

✻ गोव्याची राजधानी पणजी हे सुद्धा चांगलं ठिकाण आहे. पणजीमध्ये बरंच काही करता येईल. इथेही कॅम्पिंगचे चांगले पर्याय आहेत. पणजीच्या आसपास तंबू ठोकून राहता येईल.

✻ अंजुना बीचवर तुम्हाला खूप धम्माल करता येईल. अंजुना हे पर्यटकांच्या आकर्षणाचं केंद्र असून इथे तुम्हाला तंबू भाड्याने मिळतील. निळाशार समुद्राच्या सानिध्यात निरभ्र आकाशाखाली कॅम्पिंग करण्याचा आनंद निराळाच. त्यामुळे या बीचवर नक्की जा.

भटकंती



# ट्रेंडी डेनिम जॅकेट्स

डेनिम जॅकेट हा अत्यंत स्मार्ट आणि सदाबहार पर्याय. डेनिम जॅकेटची फॅशन कधीही जुनी होत नाही. अशी जॅकेट्स कोणत्याही ऑकेजनला चालून जातात. त्यातही भटकंती, मित्रमंडळीसोबत कॅज्युअल आउटिंग, ब्रंच पार्टी अशा प्रसंगी डेनिम जॅकेट्स कॅरी करता येतात. म्हणूनच तुमच्याकडे डेनिम जॅकेट असायला हवं. डेनिम जॅकेट कॅरी करण्याच्या या काही स्मार्ट टिप्स...

✻ तुम्ही फिकट रंगाचं डेनिम जॅकेट अशाच रंगाच्या जीन्सवर कॅरी करू शकता. पेसली प्रिंटवाला स्कार्फ गळ्याभोवती गुंडाळून तुम्हाला या जॅकेटची शान वाढवता येईल. भटकंतीला जाणार असाल तर हॅटही सोबत न्या.



✻ काळी जीन्स, काळा टी-शर्ट आणि त्यावर निळ्या रंगाचं डेनिम जॅकेट खूप शोभून दिसतं. यासोबतच काळ्या रंगाचे लेदर बूट कॅरी करा. जरा जास्तच स्टायलिश दिसायचं असेल तर तुम्ही शर्ट कंबरेला गुंडाळू शकता.

फॅशन पॅशन

✻डेनिम ऑन डेनिम लूकही खास ठरतो. ब्लू डेनिम जॅकेट आणि त्याच रंगाची जीन्स हे कॉम्बिनेशन हिट आहे. जॅकेटच्या आता कॉन्ट्रास्ट रंगाचा शर्ट घालता येईल.

✻ थोडं हटके दिसायचं असेल तर गडद निळ्या जीन्सवर खाकी रंगाचं डेनिम जॅकेट घाला. जॅकेटसोबत पांढरा टी शर्ट घालता येईल.

✻पांढरी हुडी आणि डेनिम जॅकेट हे कॉम्बिनेशनही छान दिसतं. थंडीत अशा पद्धतीने लेअरिंग करता येईल. मग काय दोस्तांनो, डेनिम जॅकेट घालून मिरवायला तयार ना!

# वजन कमी करायचं तर...

प्रत्येक जण काहीतरी उद्दिष्ट नजरेसमोर ठेऊन व्यायाम करत असतो. कोणाला वजन कमी करायचं असतं तर कोणाला तंदुरूस्त रहायला असतं. तुम्ही वजन कमी करण्यासाठी व्यायाम करत असाल तर या बाबींकडे लक्ष द्या.


✻ वजन कमी करण्याच्या प्रकियेत व्यायामासोबतच आहाराचंही खूप महत्त्व असतं. अर्थात सुरूवातीला जास्त तीव्रतेचा व्यायाम करू नये. तुम्ही व्यायामासोबत डाएट करणार असाल तर साधारण दोन आठवड्यांनी तीव्र स्वरुपाचा व्यायाम सुरू करा. सुरूवातीला चालणं किंवा सौम्य स्वरुपाचे अन्य व्यायाम करा. शरीराला सगळ्या परिस्थितीशी जुळवून घेऊ द्या. मगच पुढे जा.

✻ व्यायाम करणं आवश्यक आहे. मात्र संपूर्ण दिवसात अर्धा तास व्यायाम करून उर्वरित वेळ नुसतं बसून राहण्याला काहीच अर्थ नाही. तुम्ही काहीतरी काम करत राहायला हवं. घरातली कामं करता येतील. आवराआवर करता येईल. झाडांना पाणी घालणं, खरेदीला जाणं असं काहीही करता येईल. दिवसभर शरीराची हालचाल होणं गरजेचं आहे.

✻ डाएटप्रमाणेच व्यायामाचेही ट्रेंड पहायला मिळतात. मात्र अशा ट्रेंडच्या मागे वाहवत जाऊ नका. असे ट्रेंडी व्यायामप्रकार तुम्हाला उपयोगी पडतीलच असं नाही. काहीतरी वेगळं करून जाण्याच्या नादात तुम्हाला दुखापत होऊ शकते. त्यामुळे उगाचच न झेपणारा व्यायाम करू नका.

फिटनेस फंडा

✻ व्यायामप्रकारांमध्ये बदल करा. यामुळे तुम्ही शरीराला आव्हान देत असता. एकाच प्रकारचा व्यायाम करून कंटाळा आला तर काहीतरी वेगळं करा. स्नायूंना आराम देण्यासाठी वेळोवेळी विश्रांती घेत रहा. व्यायामात सातत्य राखा.



# झक्कास मूग डाळ भजी

झटपट रेसिपी

दोस्तांनो, आता प्रत्येकाला पावसाचे वेध लागले आहेत. रिमझिम पावसात गरमागरम भजीचा आस्वाद घेण्यासारखा दुसरा आनंद नाही. होस्टेलमध्ये गप्पांचा फड जमवताना मस्त मूग डाळ भजी समोर असतील तर दोस्तांची मैफल छान रंगेल. मूग डाळ भजीची रेसिपी जाणून घेऊ.



**सामग्री:** अर्धा किलो मूग डाळ,चमचाभर आलं-लसूण पेस्ट, बारीक चिरलेली हिरवी मिरची, चिरलेली कोथिंबिर, अर्धा टी स्पून चाट मसाला, एक चमचा गरम मसाला, चिमूटभर हिंग, मीठ आणि तेल.

**कृती:** मूग डाळ रात्रभर भिजत घाला. सकाळी पाणी काढून मिक्सरमध्ये रवाळ वाटून घ्या. एका भांड्यात काढून त्यात हिंग, गरम मसाला, चाट मसाला, आलं-लसूण पेस्ट, मिरचीचे तुकडे, कोथिंबिर आणि मीठ घालून नीट मिक्स करा. कढईत तेल गरम करा. भजीचं पीठ या तेलात हळूच सोडा. नीट तळून घ्या. सॉस किंवा चटणीसोबत खा.

# योग शिक्षक व्हायचंय?

२१ जून रोजी 'आंतरराष्ट्रीय योग दिन' साजरा केला जातो. आरोग्याच्या दृष्टीने अतिशय लाभदायक असल्यामुळे सध्या योग किंवा योगासने शिकण्याची क्रेझ वाढत आहे. परिणामी, या क्षेत्राचा जगभर विस्तार होताना दिसत आहे. ते पाहता येत्या काळात या क्षेत्रातील नोकऱ्यांची मागणीही बरीच वाढेल असे म्हणायला हरकत नाही. तुम्हालाही या क्षेत्रात करिअर करायची इच्छा असेल तर देश-विदेशात अनेक पर्याय उपलब्ध आहेत. अनेकांना आरोग्यासंदर्भातील समस्या सोडवण्यासाठी योगाची मदत झाली आहे. त्यामुळे आजच्या घडीला मोठमोठ्या संस्थांमध्ये योग शिक्षकांना मोठी मागणी आहे. या पार्श्वभूमीवर योग अभ्यासक्रमाविषयी जाणून घेऊ या...✻ योग क्षेत्रातील अनेक मोठ्या शैक्षणिक संस्थांमध्ये पदवीपूर्व, पदव्युत्तर आणि डिप्लोमाचे अभ्यासक्रम शिकवले जात आहेत. त्याचबरोबर अनेक प्रस्माणपत्र अभ्यासक्रमही उपलब्ध आहेत. तुम्ही १२वी पास असाल तर पदवीपूर्व अभ्यासक्रमासाठी अर्ज करू शकता.



वेगळ्या वाटा

✻ इंडियन इन्स्टिट्युट ऑफ योग अँड नेचरोपॅथी, नवी दिल्ली; राजर्षि टंडन ओपन विश्वविद्यालय, उत्तर प्रदेश; देव संस्कृति युनिव्हर्सिटी, हरिद्वार; उत्तराखंड युनिव्हर्सिटी ऑफ राजस्थान, वर्धमान महावीर ओपन यूनिव्हर्सिटी, राजस्थान: श्री लाल बहादुर शास्त्री राष्ट्रीय संस्कृत विश्वविद्यालय, नवी दिल्ली; बिहार योग विद्यालय या संस्थांमध्ये अभ्यासक्रम उपलब्ध आहेत.✻ योग क्षेत्रात पदवीपूर्व, पदव्युत्तर आणि डिप्लोमाचे अभ्यासक्रम केल्यानंतर तुम्ही नोकरीसाठी अर्ज करू शकता. आजकाल शाळांमध्ये योग शिक्षक, जिममध्ये योग ट्रेनर, हेल्थ रिसॉर्टमध्ये ट्रेनर तसेच रिसर्चर या पदांसाठी भरती केली जात आहे. त्याशिवाय रुग्णांवर उपचार करण्यासाठीही योग शिक्षकांची मागणी वाढू लागली आहे. यासाठी लाखो रुपयांपर्यंतही पगार मिळू शकतो.

हे दैनिक जनता आवाज मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक अजित रमेश मोरे यांनी जनता आवाज प्रेस गट नं. २५/१/२/३, कोल्हार बु., ता. राहाता, जि. अहिल्यानगर ४१३७१० येथे छापून दैनिक 'जनता आवाज', मु.पो. कोल्हार बु., ता. राहाता जि. अहिल्यानगर, ४१३७१० जिल्हा कार्यालय- गाळा नं.१, विवेकानंद पॅलेस, श्रीराम चौक, बोल्हेगाव, अहिल्यानगर ४१४१११. (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. विभागीय कार्यालय- जिजामाता चौक, सोमैय्या हायस्कूल शेजारी, व्यापारी संकुल बिल्डींग, दुसरा मजला, ता. श्रीरामपूर, जिल्हा अहिल्यानगर, ४१३ ७०९, ✻ कार्य. संपादक : महेश पोपट रक्ताटे. पोस्टल परवाना क्र. SRP/141/2025-2028/ PRGI No. MHMAR/25/RAA11. This daily Janta Awaj is published by Ajit Ramesh More, owner, printer, publisher and editor at Janta Awaj Press Gut No. 25/1/2/3, Kolhar Bk., Tal.- Rahata, Dist.- Ahilyanagar-413710. Published at District Office- Shop No.1, Vivekanand Palace, Shriram Chowk, Bolhegaon, Ahilyanagar-414111. Divisional Office-Jijamata Chowk, Near Somaiyya High School, Business Complex Building, 2nd Floor, Tal.-Shrirampur, Dist. -Ahilyanagar-413709
* Executive Editor- Mahesh Popat Raktate. Postal License Number-SRP/141/2025-2028 PRGI No.- MHMAR/25/RAA11